सांध्य दैनिक

# विदर्भ प्रजासत्ताक

https://epaper.vidarbhaprajasattak.com E-Mail : prajasattaknews24@gmail.com RNI No. - MAHMAR 2023/84526 Postel Regi. No. - AMT/RNP 546/2024-2026

❑ वर्ष - ३ रे ❑ अंक - १३७ वा ❑ अमरावती (महाराष्ट्र) ❑ सोमवार दि. २३ जून २०२५ ❑ संपादक - शुभांगी जोशी ❑ मुल्य - १ रु. ❑ पृष्ठ -६

## राज्यात ऑक्टोंबर मध्ये स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका होणार

### निवडणूक आयोगाकडून लवकरच येणार वेळापत्रक

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२३अमरावती**

राज्यात मागील काही वर्षांपासून स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका झालेल्या नाहीत. मागील तीन वर्षापासून महापालिका आणि जिल्हा परिषदांचा कारभार प्रशासकांच्या हाती आहे. दरम्यान, आता या वर्षातच महापालिका आणि जिल्हा परिषदांच्या निवडणुका होणार आहेत. याबाबत सर्व पक्षांनी तयारी सुरू केली आहे.

राज्यात ऑक्टोंबरपासून स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका होणार आहेत. महानगरपालिका आणि जिल्हा परिषदांच्या निवडणुका वेगवेगळ्या होणार आहेत. याबाबत निवडणूक आयोगाकडून लवकरच वेळापत्रक येऊ शकते.

राज्यात स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका चार टप्प्यांमध्ये होणार आहेत. ऑक्टोंबर महिन्याच्या पहिल्या आठवड्यापासूनच मतदानाला सुरुवात होणार असल्याची माहिती समोर आली आहे. याबाबत आता निवडणूक आयोग तयारी करत आहे.




राज्यातील महानगरपालिका, नगरपालिका, जिल्हा परिषदा, पंचायत समिती, आदींच्या निवडणुका कधी कोरोनाच्या संसर्गाचे कारण देत, तर कधी ओबीसी आरक्षणाचा मुद्दा समोर आणून घेतल्या गेल्या नाहीत. ओबीसी आरक्षण द्यायचे की नाही यावरसुद्धा बराच गदारोळ झाला. कोरोनाचा संसर्ग कमी झाल्यानंतर २०२० पासून राज्यात कुठे एकदा तर कुठे दोनदा, तीनदा स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांची तयारी करण्यात आली होती. पण, या निवडणुका घेण्यात आलेल्या नाहीत.

दरम्यान, जिल्हा परिषद, महानगरपालिकेसारख्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांबाबत सुप्रीम कोर्टाने ६ मे रोजी निर्णय दिला. ओबीसींना २०२२ पूर्वी असलेले आरक्षण कायम ठेवून सुप्रीम कोर्टाने राज्य निवडणूक आयोगाला चार महिन्यांच्या आत निवडणुका घेण्याचे निर्देश दिले. चार आठवड्यांच्या आता निवडणुकांसदर्भातील अधिसूचना काढण्यासही सुप्रीम कोर्टाने सांगितले होते.

२०२२ मध्ये बांठिया आयोगाचा अहवाल सादर होण्यापूर्वी अस्तित्वात असलेल्या ओबीसी आरक्षणाला महाराष्ट्र राज्यात स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका घेण्याचे निर्देश सुप्रीम कोर्टाने दिले आहेत. काही स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये ५ वर्षांपर्यंत निवडणुका झाल्या नसल्याचे कोर्टाने नमूद केले. त्यामुळे सुप्रीम कोर्टाने राज्य निवडणूक आयोगाला ४ आठवड्यांच्या आत निवडणुकीची अधिसूचना काढण्याचे निर्देश दिले आहेत.

## टेकऑफ घेण्याआधीच विमानात तांत्रिक बिघाड

### पायलटच्या सतर्कतेमुळे १७७ प्रवासी सुरक्षित

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२३चंदीगड**

अहमदाबाद विमान दुर्घटनेनंतर अनेकांच्या मनात विमान प्रवासाबद्दल धडकी भरली आहे. अलीकडेच चंदीगडच्या शहीद भगत सिंग आंतरराष्ट्रीय विमानतळावर मोठी दुर्घटना टळली. याठिकाणी लखनौला जाणाऱ्या इंडिगोच्या विमानात टेकऑफ होण्याआधीच तांत्रिक बिघाड लक्षात आला. पायलटच्या सतर्कतेमुळे विमान उड्डाण वेळीच रोखले आणि विमानातील १७७ प्रवाशांना सुरक्षित बाहेर काढण्यात आले.



बोर्डिंगनंतर विमानाचे उड्डाण रद्द केल्याने प्रवाशांमध्ये मोठी नाराजी पसरल्याचे दिसून आले.

जवळपास १ तास विमान उड्डाण खोळंबले तरीही प्रवाशांना योग्य ती माहिती दिली नाही. ही फ्लाईट सकाळी ७.१० मिनिटांनी रवाना होणार होती. सर्व प्रवासी बोर्डिंग करून विमानात बसले होते. विमान हळूहळू पार्किंग एरियातून रनवेच्या दिशेने जात होते तेव्हा पायलटला विमानातील तांत्रिक बिघाड लक्षात आला. सुरक्षेला प्राधान्य देत पायलटने तात्काळ हे विमान रनवेवरून पुन्हा पार्किंगच्या परिसरात आणले आणि सर्व प्रवाशांना सुरक्षितपणे विमानातून खाली उतरवण्यात आले. त्यानंतर फ्लाईट अचानक रद्द करण्यात आली. प्रवाशांनाही १ तास कुठलीही माहिती न दिल्याने विमानतळावरच गोंधळ उडाला.

दरम्यान, फ्लाईट रद्द झाल्यानंतर इंडिगोने प्रवाशांना अन्य विमान सेवेचा पर्याय दिला. ज्या प्रवाशांना पुन्हा प्रवास करायचा नाही त्यांना पूर्ण रिफंड देण्याचाही पर्याय दिला. काही प्रवाशांना दिल्लीतून लखनौला जाणारी कनेक्टिंग फ्लाईटची सुविधा दिली. काही प्रवाशांच्या राहण्याची व्यवस्था करण्यात आली. दुसरीकडे लखनौ येथील चौधरी शरण सिंह एअरपोर्टहून दिल्लीला येणाऱ्या जाणाऱ्या २५ फ्लाईट एअर इंडियाने रद्द केल्या. २१ जून ते १५ जुलैपर्यंत या फ्लाईट रद्द आहेत.

## अबू आझमी ही महाराष्ट्राला लागलेली कीड; अजित पवार गट आक्रमक

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२३ मुंबई**

अबू आझमी ही महाराष्ट्राला लागलेली कीड असून कायम प्रक्षोभक वक्तव्य करून महाराष्ट्रातील वातावरण खराब करण्याचे काम करत असल्याने सरकारने त्यांच्यावर कडक कारवाई करावी, अशी मागणी राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाचे मुख्य प्रवक्ते आनंद परांजपे यांनी केली आहे.



आषाढी वारीला ८०० वर्षांची परंपरा आहे. आषाढी वारी ही महाराष्ट्राची सांस्कृतिक, धार्मिक, आध्यात्मिक ओळख आहे. संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर माऊलींच्या आळंदीवरुन पालखी निघते. संत तुकारामांच्या देहू येथूनही पालखी निघते. लाखो वारकरी पायी चालत पंढरपूरला विठुरायाच्या दर्शनासाठी जातात. त्यावेळी मुस्लिम समाजाचे अनेक बांधव त्या वारीत सहभागी होतात आणि वारकर्यांना सेवा देतात याची आठवणही आनंद परांजपे यांनी अबू आझमी यांना करून दिली आहे.

कायम हिंदू - मुस्लिम राजकारण करुन अबू आझमी प्रक्षोभक वक्तव्य करत आहेत. त्यामुळे त्यांच्यावर कडक कारवाई सरकारने करावी, अशी मागणी पत्रकारांच्या प्रश्नांना उत्तर देताना आनंद परांजपे यांनी केली. यावेळी महाराष्ट्राची भाषा ही मराठीच आहे. त्यामुळे मराठी भाषेचे कुठेही नुकसान होईल अशाप्रकारचा निर्णय महायुतीचे सरकार कधीही घेणार नाही अशा शब्दात राष्ट्रवादी काँग्रेसचे मुख्य प्रवक्ते आनंद परांजपे यांनी पत्रकारांच्या प्रश्नांना उत्तर देताना भूमिका स्पष्ट केली.

## दरवर्षी ५ हजार नवीन बसेस एसटी महामंडळाच्या ताफ्यात येणार

### एसटी महामंडळाची श्वेतपत्रिका जाहीर, आर्थिक संकटातून बाहेर काढणार - प्रताप सरनाईक

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२३मुंबई**

राज्याचे परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी पत्रकार परिषद घेत एसटी महामंडळाच्या श्वेतपत्रिकेबद्दल माहिती दिली आहे. तसेच एसटी महामंडळाला आर्थिक संकटातून वाचवणार असल्याचे आश्वासन देखील सरनाईक यांनी दिले आहे. दर वर्षाला किमान १० हजार बसेसची मागणी देखील त्यांनी मुख्यमंत्र्यांकडे केली असल्याचे त्यांनी सांगितले आहे.



पत्रकार परिषदेत बोलताना परिवहन मंत्री प्रताप सरनाईक म्हणाले, दर वर्षाला १० हजार बसेस एसटी महामंडळाच्या ताब्यात आल्या तर जुन्या झालेल्या बसेस पुढल्या ५ वर्षात बाहेर काढता येतील आणि २५-३० हजार बसेसच्या जोरावर आपण चांगल्या प्रकारचे काम पुढे करू शकू, असा प्रस्ताव मी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि अजित पवार यांच्याकडे मांडला आहे. या संकल्पनेला सकारात्मक प्रतिसाद मिळाला असून दर वर्षाला ५ हजार बसेस देऊ असे अश्वासन देण्यात आले आहे.

दूसरा असा निर्णय मी घेतलेला होता की, एसटी महामंडळाच्या ताफ्यात माझ्या कार्यकाळात मी भाडेतत्वावर बसेस घेणार नाही आणि त्यामुळे भाडेतत्वावर बस ही केवळ ठेकेदाराच्या फायद्यासाठी होते असा आत्तापर्यंतचा इतिहास झालेला आहे. त्यामुळे भाडेतत्त्वावर घेण्यापेक्षा माझ्या याच चालकाला, वाहकाला घेऊन मी एसटी महामंडळ पुढे नेण्याचा प्रयत्न करेल. गरजच पडली तर २०१९ साली काही भरती प्रक्रिया थांबली होती. आता भविष्यात देखील गरज भासली तर भरती प्रक्रिया करता येईल. परंतु, एसटी महामंडळ हे आर्थिक संकटातून आम्ही बाहेर काढू.

## 'आयएफएस' बदल्यांची फाइल अडली कुठे वनअधिकाऱ्यांनी बदलीची प्रतीक्षा

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२३अमरावती**

राज्यात आयएएस आणि आयपीएस अधिकाऱ्यांच्या बदल्यांना वेग आला असताना, भारतीय वन सेवा (आयएफएस) अधिकाऱ्यांच्या बदल्या मात्र अद्यापही रखडलेल्या आहेत. सुमारे ५० ते ५५ आयएफएस अधिकारी बदली पात्र असताना मंत्रालयात ही फाइल कुठे अडली की कोणी अडवून ठेवली? याबाबत तर्कवितर्क लावले जात आहे.




बदली समितीची बैठक झाल्यानंतरही 'आयएफएस'ला नवीन जागेवर पोस्टिंग दिले गेले नाही, हे विशेष.आयएफएस बदल्यांसाठी संबंधित समितीची बैठक झाल्याची माहिती असून, नव्या नियुक्त्यांसाठी यादीदेखील तयार करण्यात आली आहे. मात्र, ही यादी अंतिम मंजुरीसाठी मुख्यमंत्री कार्यालयात का पाठवण्यात आली नाही, याचे गूढ कायम आहे. शालेय वर्ष सुरू झाल्यामुळे अनेक आयएफएस अधिकारी स्वतःच्या कुटुंबासोबत स्थायिक होण्याच्या अपेक्षेने नवीन पोस्टिंगच्या प्रतीक्षेत आहेत. काही अधिकारी मंत्रालयात वारंवार चकरा मारून थकले असून, काहींनी थेट वनमंत्री गणेश नाईक यांची भेट घेऊन बदल्यांच्या विनंती केल्याचे समजते. एकंदरीत 'आयएफएस' यांच्या रखडलेल्या बदल्यांनी वन मंत्रालय प्रकाश झोतात आले आहे.

## विधानसभेत षंढ लोक बसलेत:विधिमंडळाच्या कार्यक्रमात मराठी बोर्ड नसल्याने मनसेच्या संदीप देशपांडे यांची टीका

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२३मुंबई**

महाराष्ट्राच्या विधान भवनात सगळे षंढ बसले आहेत, अशी टीप्पणी मनसे नेते संदीप देशपांडे यांनी केली आहे. विधीमंडळात आयोजित कार्यक्रमाचा फलक मराठी भाषेत नसल्याचं पाहून देशपांडे यांनी संताप व्यक्त केला आहे. संसदेच्या अंदाज समितीला ७५ वर्षे पूर्ण झाल्यानिमित्त महाराष्ट्राच्या विधान भवनात लोकसभेने एक कार्यक्रम आयोजित केला होता. या कार्यक्रमाला लोकसभेचे अध्यक्ष ओम बिर्ला, विधानसभेचे अध्यक्ष राहुल नार्वेकर, विधान परिषदेच्या उपसभापती नीलम गोऱ्हे, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे व अनेक आमदार उपस्थित होते.



या कार्यक्रमावेळी केवळ हिंदी व इंग्रजी भाषेत फलक लावण्यात आला होता. ते पाहून संदीप देशपांडे यांनी संताप व्यक्त केला. देशपांडे म्हणाले, हे या महाराष्ट्राचं दुर्दैव आहे. विधान भवनात सगळे षंढ बसले आहेत. हे पाहून मराठी माणसाने काय करायचं.

**माझा शब्द झोंबला असेल तर विचार करावा : देशपांडे**

दरम्यान, संदीप देशपांडे यांच्या या वक्तव्यावर सत्ताधारी महायुतीच्या नेत्यांनी टीका केली आहे. त्यांच्यावर हक्कभंगाची कारवाई करण्याचा इशारा देखील देण्यात आला आहे. मात्र, त्याला देशपांडे यांनी जुमानलं नाही. ते म्हणाले, मी माझ्या वक्तव्यावर ठाम आहे. कारण मी केवळ त्या वृत्तीला बोललो, कुठल्याही व्यक्तीला बोललो नाही. माझ्यावर हक्कभंग आणला तरी मी त्या कारवाईसाठी तयार आहे. तसेच माझा शब्द कोणाला झोंबला असेल तर त्यांनी विचार करावा. त्यांच्या कृत्याने आम्हालाही वेदना होत आहेत.

## अरविंद केजरीवाल यांची राज्यसभेवर वर्णी लागण्याची शक्यता

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२३नवी दिल्ली**

पंजाब, गुजरात, केरळ आणि पश्चिम बंगाल या चार राज्यातील विधानसभेच्या पाच जागांसाठी झालेल्या पोटनिवडणुकीची मतमोजणी पार पडली. या पोटनिवडणुकीत आतापर्यंतच्या अपडेटनुसार गुजरातमधील दोन पैकी एका जागेवर भाजपनं आणि एका जागेवर आपनं विजय मिळवला आहे. केरळमधील जागेवर काँग्रेस आघाडीवर आहे.तर, पश्चिम बंगालमध्ये तृणमूल काँग्रेस आघाडीवर आहे. आम आदमी पार्टीच्या दृष्टीनं सर्वात महत्त्वाची जागा असलेल्या पंजाबमधील लुधियाना पश्चिम विधानसभा मतदारसंघात देखील आपचा उमेदवार आघाडीवर असून त्यांच्या विजयाच्या घोषणेची औपचारिकता बाकी आहे. आपला गुजरातमधील विसावदार जागेवर विजय मिळाला आहे. तर लुधियाना पश्चिममधील संजय अरोरा यांचा विजय निश्चित मानला जातोय. आपचे उमेदवार संजय अरोरा हे सध्या राज्यसभेचे खासदार आहेत. ते विधानसभेत आमदार झाल्यास त्यांच्या जागी आपचे राष्ट्रीय संयोजक अरविंद केजरीवाल यांची राज्यसभेवर वर्णी लागण्याची शक्यता आहे.



## बुलढाण्यातील मेरा खुर्दमध्ये युवकाची भर चौकात निर्घृण हत्या! कोयत्याने वार

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२३ बुलढाणा**

कोयता गँग म्हटलं की पुणे, नाशिक ही महानगरे समोर येतात. कोयता गँगने तिथे निर्माण केलेली दहशत, घातलेला धुडघूस, मनमानी हैदोस हे डोळ्यसमोर येते. आता कोयता गँग आठवण्याचे कारण म्हणजे बुलढाणा जिल्ह्यातील ग्रामीण भागात एका युवकाची कोयत्याने वार करून भर चौकात निर्घृणपणे हत्या करण्यात आली आहे.



चिखली तालुक्यातील मेरा खुर्द फाटा येथे ही थरारक घटना घडली. या प्राथमिक माहितीनुसार खून झालेल्या तरुणाचे अंदाजे वय २५ वर्षे असून त्याची ओळख अजून पटली नाही. २३ जूनच्या दुपारी हा धक्कादायक प्रकार घडला. ज्या तरुणाचा खून झाला तो तरुण चिखली वरून काळी पिवळीने मेरा खुर्द चौकी येथे पोहोचला. त्याचवेळी काही येथे त्याची वाट पाहत होते.

गाडीतून उतरल्यावर त्याच्यावर कोयत्याने वार करण्यात आले. या हल्ल्यात तो जागीच ठार झाला.घटनेची माहिती मिळताच अंढेरा पोलीस घटनास्थळी पोहोचले आहे. वरिष्ठ अधिकारी, विविध पथके देखील गावात दाखल झाली. पोलिसांनी एका मारेकऱ्याला ताब्यात घेतल्याची माहिती आहे. त्याचा सहकारी मात्र फरार असल्याचे सांगण्यात आले. मृत तरुण कोण? खून करण्याचे नेमके कारण काय ? याची अद्याप माहिती मिळू शकली नाही.

दरम्यान मृत आणि मारेकरी पर गावातील नसल्याची प्राथमिक माहिती आहे. मृत युवक हा बुलढाणा तालुक्यातील एका गावातील तर आरोपी मराठवाडा मधील जालना जिल्ह्यातील रहिवासी आहे. मोठ्या रक्कमेच्या वादातून हत्या करण्यात आल्याची चर्चा आहे. मात्र याला अधिकृत दुजोरा मिळू शकली नाही.

## उद्धव ठाकरेंना मराठवाड्यात मोठा धक्का

### राज्य सचिव संजय लाखेंचा राजीनामा, संजय राऊत-अंबादास दानवेंवर केले गंभीर आरोप

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२३जालना**

शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे राज्य सचिव आणि जालन्यातील नेते डॉ. संजय लाखे पाटील यांनी पक्षाच्या सचिवपदाचा आणि सदस्यत्वाचा राजीनामा दिला आहे. त्यांच्या या निर्णयाने मराठवाड्यात पक्षाला मोठा धक्का बसला असून, त्यांनी आपल्या राजीनामा पत्रातून पक्षाचे खासदार संजय राऊत आणि विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांच्यासह पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांच्यावर गंभीर आरोप केले आहेत. आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर संजय लाखे यांचा राजीनामा उद्धव ठाकरेंसाठी मोठा धक्का मानला जात आहे.विधानसभा निवडणुकीनंतर महाविकास आघाडीला गळती लागल्याचे दिसून येत आहे.



विशेषत: उद्धव ठाकरे यांच्या शिवसेनेतील अनेक दिग्गज नेतेपक्षाची साथ सोडून महायुतीमधील भाजप आणि शिवसेना शिंदे गटात प्रवेश करत आहेत. काही दिवसांपूर्वीच नाशिक मध्ये शिवसेना ठाकरे गटाला धक्का बसला होता. सुधाकर बडगुजर यांनी भाजपमध्ये प्रवेश केला. आता मराठवाड्यातही ठाकरे गटाला हादरा बसला आहे.

## संपादकीय ......

# मनाचा राजा..!

सध्या संपूर्ण राज्यभरात पावसाचे धूमशान सुरू आहे. वेगवेगळ्या प्रकारचे अलर्ट दिले जात आहेत. कधी ऑरेंज, कधी पिवळा, तर कधी रेड. या कुठल्याही प्रकारच्या अलर्टला न जुमानता पाऊस जिथे पाहिजे तिथे मुसळधार पडत आहे. शेतकरीवर्गाचे पेरणीचे सर्वसाधारण दरवर्षी असलेले आडाखे यावर्षी त्यांनाही बांधता येत नाहीत. कारण, पाऊस कधी पडेल, कसा पडेल आणि कुठे पडेल, याचा नेम राहिलेला नाही.

थोडक्यात सांगावयाचे, तर पाऊस हा एखाद्या शासकीय साहेबासारखा झाला आहे. आपण एखाद्या कार्यालयात जातो. विशिष्ट टेबलावरील एका विशिष्ट साहेबांकडे आपले काम असते. आपण थोडी आजूबाजूला चौकशी करतो की, साहेब कधी येणार आहेत? कारण, त्यांची खुर्ची रिकामी असते. आजूबाजूच्या मंडळींना पत्ता नसतो की, साहेब नेमके कधी येणार आहेत. आपण प्रश्न विचारला त्याचे उत्तर दिले पाहिजे म्हणून ते सांगतात की, येतील थोड्याच वेळात. या प्रकारामध्ये 'किती वेळात' याचे उत्तर भारतीय पद्धतीमध्ये निश्चित अजिबातच नाही. एखाद्या लग्नाचा मुहूर्त दुपारी ११ वाजून ४० मिनिटांनी सांगितलेला असतो. आपण आटापिटा करत तिथे पोहोचतो. प्रत्यक्षात लग्न दीड दोन वाजल्याशिवाय लागत नाही.

'साहेब येतील थोड्याच वेळात' असे कळाल्याबरोबर आपल्याकडे अन्य काही पर्याय नसतो. कारण, आपण दूरवरून तिथे आलेलो असतो, मग आपण त्या कार्यालयाच्या परिसरात फेरफटका मारून येथील बोर्ड, नोटिसा सविस्तर वाचून घेतो आणि अधून मधून साहेबांच्या रिकाम्या खुर्चीवर नजर टाकत असतो. तुम्ही सकाळी साडेदहा वाजता गेला असाल, तर साधारणतः साडेबारा वाजेपर्यंत साहेब आलेले नसतात. बायोमेट्रिक उपस्थिती नोंदवणे आवश्यक असल्यामुळे बरेचदा साहेब तुम्ही येण्याच्या आधीच बायोमेट्रिकवर बोट लावून पुन्हा त्यांच्या कामाला निघून गेलेले असतात.

साडेबारा वाजता तुम्ही अस्वस्थ होता आणि पुन्हा आजूबाजूच्या खुर्च्यांना विचारता की, साहेब कधी येणार आहेत? दोन-तीन तास घातल्यानंतर तुम्हाला अचानक माहिती प्राप्त होते की, साहेब दौर्यावर गेलेले आहेत आणि दोन-तीन दिवस तरी येणार नाहीत. तुम्ही फारच चिकित्सक असाल, तर बाजूच्या खुर्चीवाल्या कर्मचार्याला विचारलं की, दोन दिवसांत की तीन दिवसांत? यावर क्षणाचाही विलंब न लावता तो फटक्यात उत्तर देतो, 'मला माहीत नाही.' जसे साहेब कधी येणार आहेत हे कुणालाच माहीत नसते, तसाच पाऊस कधी येणार आहे, हेही कोणी सांगू शकत नाही. या कारणामुळे पावसाची आणि साहेबांची तुलना करण्याचा मोह होत आहे.

# रात्रीच्या अंधारात बिबट्याचा चक्क एसआरपीएफ कार्यालयात फेरफटका

## सीसीटीव्ही कॅमेरामध्ये या बिबट्याच्या हालचाली

**विदर्भ प्रजसत्ताक**

**दि.२३अमरावती-** येथील वडाळी परिसरात राज्य राखीव पोलीस दलाचे मुख्य कार्यालय आहे. या कार्यालयाच्या इमारतीत शनिवारी रात्री एक बिबट्या शिरला. पहाटेपर्यंत त्याचा वावर याच इमारतीत होता. सीसीटीव्ही कॅमेरामध्ये या बिबट्याच्या हालचाली चित्रित झाल्या आहेत.

राज्य राखीव पोलीस दलाच्या (एसआरपीएफ) वडाळी परिसरातील कार्यालयात बिबट्या शिरल्याची माहिती प्राप्त झाल्यानंतर वनविभागाचे बचाव पथक इमारतीत दाखल झाले, तेव्हा हा बिबट्या याच इमारतीत निवांतपणे फिरत होता. संपूर्ण इमारतीचा फेरफटका मारल्यानंतर हा बिबट्या नजीकच्या संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाच्या कुंपण भिंतीवरून उडी मारून विद्यापीठ परिसरामधील झुडपांमध्ये पळून गेला, अशी माहिती वन विभागाच्या कर्मचाऱ्यांनी दिली.

एसआरपीएफ कार्यालयाला लागूनच जंगल आहे. वडाळी, पोहरच्या जंगलात अलीकडच्या काळात बिबट्यांची संख्या वाढली आहे. जंगलात शिकार कमी उपलब्ध झाल्यास हे वन्यप्राणी शहरांकडे धाव घेतात. मानवी वस्त्यांजवळील कुत्रे हे त्यांचे भक्ष्य ठरतात. रात्रीच्या वेळी बिबट हे या कुत्र्यांची शिकार करतात. यापुर्वीही विद्यापीठाच्या परिसरात भरदिवसा बिबट्याचे दर्शन अनेकांना घडले आहे. त्यामुळे विद्यापीठ परिसरात निर्देशक फलक देखील लावण्यात आले आहेत. त्यातच आता



बिबट्याने काल रात्री एसआरपीएफच्या कार्यालयाचा फेरफटका मारला.

वडाळी, पोहरा जंगलाच्या परिसरात बिबट्यांची संख्या मोठ्या प्रमाणात वाढली आहे. जंगल परिसराला लागून असणाऱ्या काही निवासस्थानाजवळ सायंकाळी देखील बिबट दिसतो. झुडपात, एखाद्या खड्ड्यात बिबट दडून बसतो. राज्य राखीव पोलीस दल वसाहतीमधले अनेक कुत्र्याची शिकार बिबट्यांनी केली आहे. परिसरात फिरणारा बिबट आता कार्यालयाच्या इमारतीत शिरला. यावेळी येथे सेवेवर असणारे कर्मचारी सुदैवाने त्याच्या समोर आले नाहीत म्हणून मोठा अनर्थ टळला. एसआरपीएफ कर्मचारी वसाहत परिसरात महिला, लहान मुलांमध्ये बिबटची दहशत आहे. बिबट्यांपासून संरक्षणाचे उपाय करण्याची मागणी होत आहे.

संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाला लागून असणाऱ्या तपोवन परिसरात डॉक्टर कॉलनी येथे गेल्या १५ जूनला बिबट्याने चक्क एका घराच्या गेटवरून घराच्या आवारात उडी घेतली. यावेळी घरच्या आवारात असणाऱ्या कुत्र्याची शिकार बिबट्याने केली होती. हा व्हिडिओ देखील सीसीटीव्ही कॅमेरात कैद झाला होता. तपोवन, विद्यापीठ, राज्य राखीव पोलीस दल आणि महादेवखोरी या भागात बिबट्यांचा वावर मोठ्या प्रमाणात वाढला आहे. या भागातील नागरिकांनी या बिबट्यांचा बंदोबस्त करावा, अशी मागणी केली आहे.

# कमळाच्या फुलाचं गाव....भांबोरा

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२३ दर्यापुर** - दर्यापूर तालुक्यातील भांबोरा एकेकाळी मारुती महाराजांचं देवस्थान असलेलं ठिकाण म्हणून प्रसिद्ध होतो त्या ठिकाणी अगर राज्यातून सुद्धा भाविक भक्त मारुती महाराजांच्या दर्शनाकरिता यायचे कारण एका होती मारुती महाराजांचं नाव संपूर्ण महाराष्ट्राबरोबरच इतर राज्यात सुद्धा होतो कारण नेमचंद येथे पौर्णिमेला शेकडो बाहेर जिल्ह्यातील बाहेर राज्यातील भक्त श्री क्षेत्ररक्षण येथे पौर्णिमेला राहायचे त्याच भांबोरा गावात एक गावलगत गाव तळे आहे पण तो गाव तलाव गाळाने भरलेला असल्याने त्याची खोलीकरण झाले नाही आज त्या गाव तलावाला भेट दिली असता असे लक्षात आले की त्या गाव तलावात संपूर्ण तलावभर कमळाचे फुल निर्माण झालेली आहेत आणि संपूर्ण तलाव हा त्या फुलांनी भरलेला आहे एखादं कमळाचे फुल निघालं की कुत्वाला ने सर्व पाहतात मात्र इथं संपूर्ण तलाव भर फुल कळ्या ंनी भरलेलं दिसत आहे .



तसे पाहिल्यास मतदान पेटीमध्ये कमळाचे फुल असलेला चिन्ह मागे आहे मात्र गावांमध्ये सर्व कमळाचे फुलत फुल असल्याचे दिसून आल्याचे नवल वाटते ते पाहण्यासाठीच इंजिनियर नितेश वानखडे हे खास तिथे पाहण्यासाठी गेले आहेत.

# औषधं व खतांवरील खर्च कमी करण्यासाठी वापरा ही आठ संवर्धके; वाचा सविस्तर

**दि.२२विदर्भ प्रजासत्ताक**

सद्यस्थितीत सेंद्रीय शेती पध्दतीमध्ये वापरायच्या निविष्ठांचा दर्जा गुणावत्ता व उपलब्धता याबाबी सेंद्रीय शेती पध्दतीचा विकासास मारक ठरत असल्याचे आढळून येते.

सेंद्रीय शेती पध्दतीमध्ये प्रामुख्याने सेंद्रीय व जैविक निविष्ठांच्या माध्यमातून बीजप्रक्रिया करून अन्नद्रव्य, कीडींचे व रोगांचे व्यवस्थापन करता येईल.

बिजप्रक्रिया व संवर्धकांचा वापर

**१) रायझोबियम कल्चर**

बियाण्याला लावण्याचे प्रमाण : २५ ग्रॅम/२५ मिली प्रति किलो बियाणे.

**उपयोग** : डाळवर्गीय पिकांसाठी बिजप्रक्रियेद्वारे नत्राची उपलब्धता वाढविण्यासाठी.

**२) ॲझोटोबॅक्टर कल्चर**

बियाण्याला लावण्याचे प्रमाण : २५ ग्रॅम/२५ मिली प्रति किलो बियाणे.

**उपयोग** : तृणधान्यवर्गीय व इतर पिकांसाठी बिजप्रक्रियेद्वारे नत्राची उपलब्धता वाढविण्यासाठी.

**३) ॲझोस्पिरीलम**

बियाण्याला लावण्याचे प्रमाण : २५ ग्रॅम/२५ मिली प्रति किलो बियाणे.

**उपयोग** : तृणधान्यवर्गीय व इतर पिकांसाठी बिजप्रक्रियेद्वारे नत्राची उपलब्धता वाढविण्यासाठी.

**४) ॲसिटोबॅक्टर**

बियाण्याला लावण्याचे प्रमाण : ५०० गॅम/५० लीटर पाण्यात.

**उपयोग** : ऊस पिकासाठी बेणे प्रक्रियेद्वारे नत्राची उपलब्धता वाढविण्यासाठी.

**५) रायझोबियम कल्चर**

बियाण्याला लावण्याचे प्रमाण : २५ ग्रॅम/२५ मिली प्रति किलो बियाणे.

**उपयोग** : सर्व प्रकारच्या पिकांसाठी स्फुरदची उपलब्धता वाढविण्यासाठी.

**६) सुडोमोनास**

प्रमाण : ५ ते १० ग्रॅम किंवा ५ ते १० मिली प्रति किलो बियाणे.

**उपयोग** : सर्व प्रकारच्या पिकांसाठी सुरुवातीच्या अवस्थेत बिजप्रक्रियेद्वारे बुरशीजन्य रोगांपासून बचाव करण्यासाठी.

**८) जिवाणुसंघ**

बियाण्याला लावण्याचे प्रमाण : १० मिली/किलो बियाणे.

**उपयोग** : नत्र, स्फुरद व पालाशची उपलब्धता.

विदर्भ प्रजासत्ताक कृषी विशेष




शेतकरी ते थेट ग्राहक
कामधेनु नॅचरल्स
उत्तम आहार सर्वोत्तम जीवन
विषमुक्त फळे, भाजी व धान्य एकाच ठिकाणी
समर्थ हायस्कूल जवळ, अकोला अर्बन बँकेच्या बाजुने देवरणकर नगर, अमरावती
नंदकिशोर गांधी, मो. ७७२००७७५५०




# वारंवार डोकं दुखते- सिडिटीचा त्रास? 'या' पद्धतीने खा हिरवी वेलची, त्रास होईल कमी-पचन सुधारेल

**दि.२३विदर्भ प्रजासत्ताक**

हिरव्या वेलचीचे आरोग्याला अनेक फायदे आहेत. हिरव्या वेलचीमध्ये अँटीऑक्सिडंट्स, अँटी-बॅक्टेरियल आणि अँटी-इंफ्लेमेटरी गुणधर्म आहेत.जे आपल्या शरीराला अनेक समस्यांपासून वाचवण्यास मदत करतात. तसेच गॅस, अपचन, तोंडाची दुर्गंधी आणि आम्लता सारख्या समस्यांसमध्ये आराम देतात.रक्तदाब नियंत्रित करण्यासाठी आणि शरीरातील साखर सुरळीत ठेवण्यासाठी वेलचीचा उपयोग होतो. सध्या अनेकांना पोटाच्या समस्या, ताणतणाव आणि रक्तदाब सारख्या समस्यांचा त्रास होत आहे.त्यामुळे जेवल्यानंतर एक वेलची खाणे अनेक आजारावर रामबाण ठरेल. पाहूया वेलची खाण्याचे आणखी फायदे

१. जेवल्यानंतर हिरवी वेलची खाल्ल्याने पचनसंस्थेला आराम मिळतो. यात असलेले एन्झाईम्स पचन सुधारण्यास आणि अन्न पचवण्यास मदत करतात. ज्यांना गॅस, अपचन किंवा पोटाची समस्या असेल त्यांनी नियमितपणे वेलची खायला हवी. वेलचीमध्ये असलेले घटक स्नायूंना आराम देते. तसेच अन्नपचायला मदत होते.

२. जर आपल्याला वारंवार पोटात गॅस, छातीत जळजळ किंवा ढेकर येत असेल तर हिरवी वेलची रामबाण आहे. यामुळे पोटातील आम्लता नियंत्रणात राहते. वेलचीमध्ये आढळणारे तेल नैसर्गिकरित्या गॅस बाहेर काढण्यास मदत करतात. ज्यामुळे पोट फुगलेले वाटत नाही. खाल्ल्यानंतर वेलची चावल्याने पोटाला थंडावा मिळतो,



तसेच जळजळीपासून आराम मिळतो.

३. वजन कमी करणाऱ्यांसाठी वेलची फार उपयुक्त आहे. वेलचीमुळे चयापचय गतिमान करुन वजन कमी होते. यात असणारी संयुगे शरीरातील चरबी जाळण्याची प्रक्रिया वेगाने करतात. तसेच भूक देखील नियंत्रणात राहते. याची चव आपला मूड आणि स्ट्रेस कमी करु शकते. यात असणारे अँटीऑक्सिडंट घटक मनाला शांत करण्यास मदत आहे.

४. वेलचीमध्ये पोटॅशियम, मॅग्नेशियम आणि फायबर सारखे घटक असतात जे आपल्या शरीरातील रक्तदाब नियंत्रित करतात. रक्ताभिसरण सुधारुन हृदय निरोगी ठेवण्यास उपयुक्त आहे. जर आपल्याला वारंवार डोके दुखीचा त्रास होत असेल वेलची चघळून खाल्ल्याने आराम मिळेल. मधुमेहाच्या रुग्णांसाठी वेलची आरोग्यदायी पर्याय आहे.

# श्री हव्याप्र मंडळाच्या शुटिंग विभागाला सुवर्ण पदक

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२३अमरावती-** मुंबई येथे नुकत्याच पार पडलेल्या २८ व्या कॅप्टन इझेकीएल २०२५ स्पर्धेत श्रीहनुमान व्यायाम प्रसारक मंडळाच्या शूटिंग विभागालाला एक सुवर्ण व एक रजत पदक प्राप्त झाले.

श्री हव्याप्र मंडळ शुटिंग विभाग प्रमुख आयएसएसएफसी प्रशिक्षक राहुल उगले यांच्या मार्गदर्शनाखाली शुटिंग विभागाचा समर्थ वारे याने २५ मीटर स्टेंडर्ड पिस्टोल शुटिंग प्रकारात २७५/३०० असा स्कोर करून सुवर्ण पदक जिंकले. तर



खालिद खत्री याने ५० मीटर श्री पोजिशन रायफल शुटिंग प्रकारात रजत पदक जिंकले. विशेष म्हणजे, मंडळाच्या शुटिंग विभागातील खेळाडू सलग तीन वर्षांपासून पदक जिंकत आहेत.

श्री हनुमान व्यायाम प्रसारक मंडळाच्या शुटिंग विभागाच्या सातत्यपूर्ण यशाबद्दल मंडळाचे प्रधान सचिव पद्मश्रीप्रभाकरराव वैद्य, अध्यक्ष ॲड. रवि देशपांडे, कार्याध्यक्ष ॲड. प्रशांत देशपांडे, उपाध्यक्ष डॉ. श्रीकांत चेंडके, सचिक प्रा.डॉ. माधुरी चेंडके, कोषाध्यक्ष प्राचाय डॉ. श्रीनिवास देशपांडे, सचिव डॉ. विकास कोळेश्वर, सचिव प्रा.रवींद्र खांडेकर प्रा. ललित शर्मा, आनंद महाजन यांच्यास विजेत्या खेळाडूंवर अभिनंदनाचा वर्ष होत आहे.

# डॉ. उपेंद्रजी कोठेकर यांचे साहित्यिक योगदान अत्यंत मोलाचे - प्रविण पोटे पाटील

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२३नागपूर**

चौथ्या काव्यसंग्रहाचा प्रकाशन सोहळा निमित्त डॉ. उपेंद्रजी कोठेकर यांचा सत्कारसाहित्य भारती (विदर्भ प्रांत) यांच्या वतीने आयोजित आणि लाखे प्रकाशन प्रकाशित, विदर्भ भाजपा संघटन मंत्री मा. डॉ. उपेंद्र कोठेकर यांच्या नाठाळाच्या माथी या चौथ्या काव्यसंग्रहाचा प्रकाशन सोहळा विदर्भ साहित्य संघ, नागपूर येथे संपन्न झाला. हा समारंभ साहित्य, समाज व राजकारणातील अनेक दिग्गजांच्या उपस्थितीत अत्यंत उत्साहात पार पडला. या समारंभास माजी राज्यमंत्री श्री प्रविण पोटे पाटील प्रामुख्याने उपस्थित होते. डॉ. उपेंद्रजी कोठेकर आपली पक्षीय जबाबदारी चोखपणे सांभाळत अत्यंत व्यस्ततेथही काव्य लिहतात त्यांचे साहित्यिक योगदान अत्यंत महत्त्वाचे असून त्यांचे साहित्यामधून, कवितासंग्रहातून सामाजिक जाणीव, मानवी भावना आणि ग्रामीण वास्तव यांचे सुरेख दर्शन घडते असे गौरवोद्गार प्रविण पोटे पाटील यांनी यावेळी काढले. माजी



राज्यमंत्री श्री प्रविण पोटे पाटील यांनी डॉ. उपेंद्रजी कोठेकर यांचा शाल श्रीफळ देऊन सत्कार व सन्मान करत पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्यात. या प्रसंगी डॉ. नितीन जी धांडे जिल्हाध्यक्ष, अमरावती शहर भाजप, मा. शिवराय कुलकर्णी प्रदेश प्रवक्ता, भाजप, चेतन पवार माजी उपमहापौर, अमरावती, नितीन गुडदे पाटील माजी सरचिटणीस, अमरावती जिल्हा, सतीश करेसिया माजी सरचिटणीस, अमरावती शहर, डॉ. विलास कविटकर माजी सरचिटणीस, अमरावती जिल्हा, सचिन साधनकर अध्यक्ष, चंद्रपूर जिल्हा कबड्डी असोसिएशन, लखन राज माजी नगरसेवक उपस्थित होते.

आपल्या परिसरातील बातम्या, लेख, यशोगाधा, जाहिरात तुम्ही आमच्या मेल वर पाठवू शकता prajasattaknews.24gmail.com, arunjoshi.ucn@gmail.com या मेल वर पाठवा आमचा अंक तुम्हाला अगदी मोफत मिळवायचा असेल तर आम्हाला मेल करा तुमचा व्हाट्सअप नंबर
सांध्य दैनिक विदर्भ प्रजासत्ताक RNI NO-M-HM-R 2023/84526-प्रिंट / PDF / वेब - पोर्टल /ई - पेपर

# विदर्भ प्रजासत्ताक


क्यु आर कोड स्कॅन करा ग्रुप ला जॉइन व्हा

सोमवार दि. २३ जून २०२५ — शहर/ग्रामिण


# अकरावी प्रवेश; गुणवत्ता यादीकडे लक्ष

## वेळापत्रकात बदल होत असल्याने विद्यार्थी गोंधळले, २६ जूनची प्रतीक्षा

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२३अमरावती –** अकरावी प्रवेश प्रक्रियेच्या वेळापत्रकात वारंवार केल्या जाणारा बदलांमुळे विद्यार्थी, पालक त्रस्त झाले आहेत. तांत्रिक अडचणीमुळे पुढे ढकलण्यात येत असून १२ ते १४ दरम्यान व्यवस्थापन कोट्यातील प्रवेश प्रक्रिया पूर्ण झाली आहे. आता २६ जून रोजी पहिली गुणवत्ता यादी जाहीर होणार असल्याचे विभागीय संचालकांनी सांगितले आहे. या बदलांमुळे विद्यार्थ्यांनाही माहिती देण्यात महाविद्यालयांना अडचणी येत असल्याचे चित्र दिसून आले. तसेच त्यांच्यापर्यंत योग्य त्या वेळेत सर्व माहिती पोहोचत नसल्याचे विद्यार्थ्यांनी म्हटले आहे. तर व्यवस्थापन






कोट्यातील जागा रिक्त राहिल्यास त्या जनरल कोट्यासाठी संस्थांना जमा कराव्या लागणार आहेत.

यंदा दहावीच्या परीक्षा लवकर झाल्याने निकालही लवकर जाहीर करण्यात आला. त्यामुळे प्रवेश प्रक्रिया वेळेत पूर्ण होईल, अशी अपेक्षा होती. परंतु निकाल लवकरच जाहीर झाला. अकरावी नोंदणी प्रक्रियाही लवकर करण्यात आली. मात्र राज्यभरात यंदा ऑनलाइन करण्यात आलेल्या प्रवेशामुळे वेळोवेळी वेळापत्रकात बदल केले जात आहे. याचा त्रास विद्यार्थी, पालक व कनिष्ठ महाविद्यालयांना देखील सहन करावा लागतो आहे. नोंदणी प्रक्रियेत जिल्ह्यातील २७ हजार ४२१ विद्यार्थ्यांनी नोंदणी केली. काही विद्यार्थ्यांना तांत्रिक अडचणीमुळे अर्ज नोंदणी करता आली नाही. त्या विद्यार्थ्यांना प्रत्येक फेरीनंतर आता नोंदणी करण्याची संधी देण्यात आली आहे. परंतु, नोंदणी प्रक्रियेला २५ दिवस पूर्ण झाले तरीही गुणवत्ता यादी जाहीर करण्यात आली नाही. ८ जून रोजी व्यवस्थापन कोटा खुला करत ११ जूनपर्यंत या ५ टक्के जागांवर प्रवेश होतील, असे जाहीर करण्यात आले. यातही विलंब झाला असून या कोट्यातील प्रवेश ते १४ तारखेला पूर्ण झाले आहेत.प्रवेश यादी होणार जाहीर मूळ वेळापत्रकानुसार दुसरी गुणवत्ता यादी २० जून रोजी जाहीर होणार होती. मात्र काही तांत्रिक अडचणी आणि अर्ज प्रक्रियेतील अपूर्णता लक्षात घेता पहिली गुणवत्ता यादी २६ जून रोजी जाहीर करण्यात येणार आहे.

# निधीच नसल्याने मेळघाटात फिरत्या पथकाची चाके थांबली

## अनेक दिवसांपासून ७ फिरती आरोग्य एकाच ठिकाणी थांबून

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२३ मेळघाट**
पावसाळ्यात मेळघाटातील दुर्गम भागातील अनेक गावांचा जिल्ह्याशी संपर्क तुटण्याचा धोका असतो. अशा परिस्थितीत त्या त्या गावांमध्ये आरोग्य यंत्रणा सक्षम असणे गरजेचे आहे. गावांचा संपर्क तुटला तर गावांमध्ये असलेल्या गरोदर माता, कुपोषणाच्या 'सॅम' श्रेणीत असलेल्या बालकांच्या आरोग्याची निगा राखण्याचा प्रश्न निर्माण होऊ शकतो. मात्र, दुर्गम गावात आरोग्य सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी आवश्यक पुरेशी यंत्रणा उपलब्ध नसल्याचे वास्तव समोर आले आहे.




फिरत्या पथकांच्या वाहनांना दुरूस्तीसाठी निधी नाही, टायर्ससाठी निधी नाही. टायर बदलविण्यासाठी अकोला, मुंबई, पुणे येथील कार्यालयांवर विसंबून रहावे लागते. विक्रेंद्रीकरण आवश्यक आहे. सर्व काही तिकडेच आहे. केवळ चर्चा करा आणि बैठका करा, हेच आरोग्य कर्मचाऱ्यांच्या हाती आहे.
**– ॲड. बंड्या साने,** खोज संस्था, मेळघाट.

मेळघाटात ७ फिरती आरोग्य पथके आहेत. पण, त्यांना उपलब्ध करून देण्यात आलेली वाहने ही एकाच ठिकाणी थांबून आहेत. या वाहनांचे टायर बदलण्यासाठी देखील आरोग्य विभागाकडे निधी नसल्याने आरोग्य कर्मचाऱ्यांवर ताण आहे. टायर बदलून घेण्यासाठी अकोला, मुंबई, पुणे येथील कार्यालयांवर विसंबून रहावे लागते. देखभाल–दुरूस्तीसाठी निधी मिळत नसल्याने या फिरत्या पथकांनी काम कसे करायचे, हा प्रश्न निर्माण झाला आहे.

मेळघाटातील अनेक भागात अद्यापही रुग्णवाहिका, प्राथमिक आरोग्य केंद्रांची उभारणी आणि पुरेशा प्रमाणात वैद्यकीय अधिकाऱ्यांची आणखी गरज आहे, असे राज्य सरकारला जिल्हा आरोग्य यंत्रणेने कळवले आहे, पण अजूनही पुरेशा प्रमाणात मनुष्यबळ आणि साधन सुविधा उपलब्ध होऊ शकल्या नाहीत, असे सूत्रांनी सांगितले.

गेल्या दहा वर्षांच्या आकडेवारीचा अभ्यास करून मेळघाटात 'मिशन–२८' राबविण्यात आले. यात भरारी पथकाने मोलाचे योगदान दिले. त्यामुळे २०१३–१४ मध्ये ३३८ असणारा बालमृत्यू दर हा २०२४–२५ मध्ये १५६ वर आला आहे. तर दहा वर्षांपुर्वी असणारा माता मृत्यू दर हा ५ वर आणण्यात आरोग्य यंत्रणेला यश मिळाले आहे.

महत्वाचे म्हणजे उपजत मृत्यू १३४ वरून ७९ वर आणण्यात आले आहे, असा दावा आरोग्य विभागाने केला आहे. संस्थात्मक प्रसूतींची टक्केवारी वाढली आहे. नवसंजीवनी योजनेअंतर्गत धारणी तालुक्यात १२ आणि चिखलदरा तालुक्यात १० असे २२ भरारी पथके कार्यान्वित आहेत. मात्र फिरत्या पथकांकडे वाहनेच नसतील, तर कामे कशा पद्धतीने होतील, हा प्रश्न आता विचारला जात आहे.

# अमरावतीसह विदर्भात पावसाची ५७ टक्के तूट

## सोशल मिडीयावरील हवामान तज्ज्ञांमुळे शेतकरी बळी

## अनेक भागातील शेतकऱ्यांवर दुबार पेरणीचे संकट

**विदर्भ प्रजसत्ताक**
**दि.२३ अमरावती :**
मोसमी पावसाने राज्य व्यापल्याची घोषणा भारतीय हवामान खात्याने केली. मात्र, विदर्भासह मराठवाडा आणि खानदेशाकडे मोसमी पावसाचे वारे आले, पण पावसाने पाठ फिरवली. जून महिन्यातील पहिल्या २० दिवसांच्या कालावधीत राज्याच्या या तीनही भागात पावसाची मोठी तूट दिसून आली. अमरावती जिल्ह्यासह विदर्भात ५७टक्के पावसाची तूट आहे, जी देशात सर्वाधिक आहे. तर मराठवाड्यात ३९ टक्के पावसाची तूट आहे. त्याचा परिणाम या भागातील पेरण्यांवर झाला असून अनेक भागात शेतकऱ्यांवर दुबार पेरणीचे संकट उद्भवले आहे. तर बहुतांशभागात पेरण्या लांबणीवर पडण्याची शक्यता आहे. विशेषतः अमरावती जिल्ह्यातील दर्यापूर, अचलपूर, चांदुर बाजार तालुक्यातील बहुतांश भागात अनेक शेतकऱ्यांनी पेरण्या आटोपल्या आहेत. राजस्थानचा पूर्व भाग जिथे विदर्भापेक्षा केवळ एक तृतीयांश पाऊस पडतो, तिथे यंदा विदर्भाच्या जवळपास दुप्पट पाऊस झाला आहे. पूर्व राजस्थानात सर्वसाधारण ३०.९



मिलीमीटर पाऊस पडतो आणि यावेळी तिथे ७३.३ मिलीमीटर पाऊस पडला. तर विदर्भात ९३.३ मिलीमीटर पाऊस पडतो आणि तिथे ३९.७ मिलीमीटर पाऊस पडला. विदर्भात बंगालच्या उपसागरावरुन येणाऱ्या कमी दाबाच्या पट्ट्यामुळे भरपूर पाऊस पडतो, पण व्यावर्षी अजूनही तशी स्थिती निर्माण झालेली नाही.मे मध्ये झालेल्या वादळी पावसानंतर आणि मुंबईत झालेल्या पावसानंतर समाजमाध्यमांवर काही स्वघोषित हवामान तज्ज्ञांनी मोसमी पावसाचे अंदाज देण्यास सुरुवात केली. त्याला शेतकरी बळी पडले आणि त्यांनी पेरणीला सुरुवात केली. मराठवाड्यात सुमारे ६० ते ७० टक्के शेतकऱ्यांनी पेरण्या केल्या आहेत. तर विदर्भात २० ते ३० टक्के शेतकऱ्यांनी पेरण्या केल्या आहेत. मात्र, पावसाअभावी दुबार पेरणीचे संकट शेतकऱ्यांवर आहे.

यावर्षी स्थिती जास्त धोकादायकराज्यात आम्ही सगळीकडेच फिरत असताना विदर्भ व मराठवाड्यातील पेरणीची परिस्थिती यावर्षी जरा जास्त धोकादायक वाटत आहे. मराठवाड्यातील लातूर, धाराशिव, बिड, परभणी, जालना या जिल्ह्यात पेरणीला धोका आहे. दुबार पेरणीचे संकट शेतकऱ्यांवर उद्भवणार अशी चिन्हे आहेत. विदर्भात देखील काही ठिकाणी पेरण्या झाल्या आहेत. विशेषतः अमरावती जिल्ह्यातील दर्यापूर, अचलपूर, चांदुर बाजार तालुक्यातील बहुतांश भागात अनेक शेतकऱ्यांनी पेरण्या आटोपल्या आहेत. पण पेरण्या वाया जाण्याचीच शक्यता अधिक आहे. समाजमाध्यमांवर स्वघोषित हवामान तज्ज्ञांच्या अंदाजामुळे देखील शेतकरी तोंडघशी पडत आहेत.

# अमरावतीसह ३० वैद्यकीय महाविद्यालयांना नोटीस

## महाविद्यालयांनी निकषांची पूर्तता न केल्याचे समोर

### प्रधान सचिव, डीएमईआर संचालकांना उपस्थित राहण्याचे आदेश

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२३ अमरावती,–** राष्ट्रीय आयुर्विज्ञान आयोगाने (एनएमसी) वैद्यकीय महाविद्यालयांमधील जागांच्या वार्षिक नूतनीकरणासाठी तपासणी केली असून त्यात राज्यातील ३० वैद्यकीय महाविद्यालयांनी निकषांची पूर्तता केली नसल्याच आढळल आहे. यामुळेया महाविद्यालयांना करणे दाखवा नोटीस बजाविण्यात आली आहे. यामध्ये राज्यात नव्याने मान्यता मिळालेल्या अमरावतीसह १० महाविद्यालयांचा ही समावेश आहे. याबाबत महाविद्यालयांना पाठवलेल्या कारणे दाखवा नोटीसला समाधानकारक उत्तर न मिळाल्याने एनएमसीने थेट वैद्यकीय शिक्षण विभागाचे प्रधान सचिव आणि डीएमईआरच्या संचालकांना ही उपस्थित राहण्याचे आदेश दिले आहेत.नव्यानेच सुरूझालेल्या १० पैकी ९ वैद्यकीय महाविद्यालयांचा समावेश. पुढे आलेल्या माहिती नुसार, एनएमसीचे पदवीपूर्व वैद्यकीय शिक्षण मंडळ (यूजीएमईबी) २०२५–२६ या शैक्षणिक वर्षासाठी एमएसएमई आर नियमन २०२३ नुसार वैद्यकीय अभ्यासक्रमांच्या जागांचे वार्षिक नूतनीकरण करण्याची प्रक्रिया राबवित येते. या मूल्यांकन प्रक्रियेमध्ये वैद्यकीय महाविद्यालयांनी सादर केलेले स्व–घोषणापत्र, आधार सक्षम बायोमेट्रिक उपस्थिती प्रणाली मधील प्राध्यापकांच्या उपस्थितीचा डेटा, वैद्यकीय मापदंड आणि पायाभूत सुविधा यांची तपासणी करण्यात आली.




या मूल्यांकनानंतर राज्यातील तब्बल ३० वैद्यकीय महाविद्यालयांमध्ये प्राध्यापकांची अपुरी संख्या, वैद्यकीय सोयी–सुविधा आणि पायाभूत सुविधांचा अभाव असल्याचे निदर्शनास आले. त्यामुळे वैद्यकीय महाविद्यालयांना कारणे दाखवा नोटीस पाठविण्यात आली.प्रधान सचिव आणि संचालकांनाच थेट उपस्थित राहण्याचे आदेश नोटीसीवर वैद्यकीय महाविद्यालयांनी सादर केलेल्या अहवालाची तपासणी केल्यानंतर उत्तर असमाधानकार असल्याचे आढळून आले. तसेच सातत्याने या त्रुटी अढळत असून, त्या दूर करण्यासाठी संस्थांकडून कोणतेही प्रयत करण्यात आले नसल्याचेही निदर्शनास आले आहे. या वैद्यकीय महाविद्यालयांमधील सुविधांबाबत मूल्यांकनामध्ये प्रश्नचिन्ह निर्माण करण्यात आल्याने अखेर राष्ट्रीय आयुर्विज्ञान आयागाने राज्याच्या वैद्यकीय शिक्षण विभागाचे प्रधान सचिव आणि डीएमईआरच्या संचालकांनाच थेट उपस्थित राहण्याचे आदेश दिले आहेत. 'या' महाविद्यालयांना पाठविली नोटीस गतवर्षी मान्यता मिळालेल्या १० शासकीय वैद्यकीय महाविद्यालयां पैकी मुंबई, अंबरनाथ, अमरावती, हिगोली, वाशिम, गडचिरोली, जालना, बुलढाणा आणि भंडारा यान ऊसंस्थांसह सोलापूरमधील डॉ. वैशंपायन मेमोरियल वैद्यकीय महाविद्यालय, बारामती, रत्नागिरी, अकोला, चंद्रपूर, गोंदिया, उस्मानाबाद, सातारा, अलिबाग, जळगाव, मिरज, नंदुरबार, परभणी, सिधुदुर्ग, नागपूरमधील इंदिरा गांधी वैद्यकीय महाविद्यालय, यवतमाळमधील श्री. वसंतराव नाईक वैद्यकीय महाविद्यालय, कोल्हापूरमधील राजश्री छत्रपती शाहू महाराज शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, धुळ्यातील श्री भाऊसाहेब हिरे शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, पुण्यातील आर्मड् फोर्स वैद्यकीय महाविद्यालय, नांदेडमधी डॉ. शंकरराव चव्हाण शासकीय वैद्यकीय महाविद्यालय आणि मुंबई महानगरपालिकेचे शीव रुग्णालय यांचा समावेश आहे.

# विदेशी दारूसाठ्यासह ३.१६ लाखांचा मुद्देमाल जप्त

## नाकाबंदी करून संशयित वाहन थांबवून पाहणी

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२३अमरावती–** अवैधरीत्या विदेशी दारूची वाहतूक करणाऱ्या एकाला गुन्हे शाखेच्या युनिट दोनच्या पथकाने व्हीएमव्ही कॉलेजसमोर पकडले. त्याच्याकडून विदेशी दारूसाठा व वाहन असा एकूण ३ लाख १६ हजार ८१० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. ही कारवाई रविवारी (दि. २२) केली.

शेगाव नाका ते कठोरा मार्गाच्या दिशेने एक जण वाहनातून विदेशी दारूची अवैधरीत्या वाहतूक करत असल्याची माहिती गस्तीवर असलेल्या गुन्हे शाखेच्या युनिट दोनला मिळाली. या माहितीच्या आधारावर व्हीएमव्ही कॉलेजसमोर नाकाबंदी करून संशयित वाहन थांबवून पाहणी करण्यात आली. त्यावेळी वाहनात ६६ हजार ८१० रुपयांची विदेशी दारू आढळून आली. वाहनातील व्यक्तीची चौकशी केल्यावर त्याने त्याची ओळख मनोहर उर्फ मनोज दगडू चौधरी (३८, रा. हनुमान नगर, खोलापुरी गेट, अमरावती) अशी सांगितली. हा दारू साठा गोपीचंद भांबोरे (रा. दीपार्चन लॉन मागे,



अमरावती) याचा असल्याचे सांगितले. त्यानुसार दोघांविरुद्ध गाडगेनगर ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. ही कारवाई गुन्हे शाखेच्या युनिट दोनचे पोलिस निरीक्षक संदीप चव्हाण यांच्या नेतृत्वात सहायक पोलिस निरीक्षक महेश इंगोले व पथकाने केली आहे.

# नागपुरी गेट, फ्रेजरपुरा, बडनेरा हद्दीत राहणार वाहतूक शाखेचे तीन कार्यालये १५० अधिकारी, अंमलदारांचा समावेश

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२३अमरावती–** शहरातील वाढती वाहतूक लक्षात घेता पो–लीस आयुक्त अरविंद चावरिया यांनी शहरातील वाहतूक व्यवस्था सुरळीत करण्याचा निर्णय घेतला. यापूढे शहरात वाहतूक शाखेचे तीन वेगवेगळे कार्यालय राहणार आहेत. यामध्ये राजापेठ, फ्रेजरपुरा आणि बडनेरा या तीन झोनचे तीन अधिकारी राहणार असून १५० अतिरिक्तमनुष्यबळसुध्दा दिले आहे.पोलीस आयुक्त कायालयात पोलीस उपायुक्तांचे दोन झोन आहेत. तसेच एसीपींचे तीन झोन असल्यामुळे वाहतूक शाखेचेही स्वतंत्र तीन वेगवेगळे झोन तयार करण्यात आले. प्रत्येक झोनला एक पोलीस निरीक्षक देण्यात आले आहे. तसेच त्यांचे कार्यालये राजापेठ, नागपुरी गेट व बडनेरा पोलीस ठाण्याच्या हद्दीत राहणार आहे. शहराची लोकसंख्या व वाहनांची वाढती संख्या पाहता शहराच्या मुख्य बाजारपेठमध्ये पायी चालणेसुध्दा कठीण आहे. त्यामुळे दरदिवसाला मुख्य बाजारपेठमध्ये किरकोळ अपघात होतात. तसेच मुख्य बाजारपेठमध्ये अतिक्रमणसुध्दा मोठ्या प्रमाणात वाढले



असुन काही मॉल व व्यापाऱ्यांनी पार्किंगची जागाच गिळंकृत केली आहे. परंतु मनपा कुठलीच कारवाई करीत नाही. त्यामुळे शहरातील वाहतूक व्यवस्था सुरळीत करण्याकरिता पोलीस विभागाने कंबर कसली आहे. आधी शहरात वाहतूक शाखेचे दोन झोन होते, परंतु यापुढे तीन झोन राहणार आहेत. यामध्ये राजापेठ वाहतूक विभागाचे पोलीस निरीक्षक प्रवीण वांगे प्रमुख आहेत.त्यांच्याकडे कोतवाली, राजापेठ, खोलापुरी गेट आणि भातकुली ठाण्याचा परिसर असणार आहे. गाडगेनगर वाहतूक विभागाची जबाबदारी पोलीस निरीक्षक रिता उईके यांच्याकडे देण्यात आली आहे. त्यांच्याकडे गाडगेनगर, नागपुरी गेट आणि वलगाव हा परिसर राहणार आहे. तर फ्रेजरपुरा वाहतूक विभागाच्या प्रमुख पोलीस निरीक्षक ज्योती विल्हेकर आहेत. त्यांच्याकडे फ्रेजरपुरा, नांदगाव पेठ आणि बडनेरा या तीन ठाण्यांचा समावेश आहे. तसेच प्रवीण वांगे यांचे कार्यालय राजापेठ ठाण्यातील सरकारी वसाहतमध्ये राहणार आहे. रिता उईके यांचे कार्यालय नागपुरी गेट व विल्हेकर यांचे फ्रेजरपुरा वाहतूक विभागाचे कार्यालय बडनेरा पोलीस स्टेशनमध्ये राहणार आहे.

# अपहरणानंतर अल्पवयीन युवतीवर बलात्कार

## प्रसूतीसाठी दाखल केल्याने गुन्हा उघड

### आशा वर्करच्या तक्रारीवरून गुन्हा दाखल

**विदर्भ प्रजासत्ताकदि.२३अमरावती २२**
एका २१ वर्षीय आरोपीने अल्पवयीन युवतीचे अपहरण करून तिच्या जबरीने बलात्कार केला. युवतीला गर्भधारणा झाल्यानंतर तिची प्रसूतीची वेळ जवळ आल्याने तिला रूग्णालयात दाखल केल्यामुळे ही घटना उघड झाली. याबाबत पोलिसांनी आशा वर्करच्या तक्रारीवरून आरोपीविरोधात गुन्हे दाखल केले आहे.अनिल रतीलाल जांभेकर (२१) रा. जुटपाणी, धारणी असे गुन्हे दाखल झालेल्या आरोपीचे नाव आहे. माहितीनुसार, आरोपी अनिलची डिसेंबर २०२३ मध्ये १७ वर्षीय पिडीत युवतीसोबत ओळख झाली. ओळख झाल्यानंतर अनिलने अल्पावधीच युवतीला विवाहाचे आमिष देऊन तिला पळून जाण्यास मानसिकरित्या तयार केले. युवतीने होकार दर्शविताच अनिलने १ जानेवारी २०२४ रोजी तिचे अपहरण केले. अपहरणानंतर दोघेही लिव्ह इन मध्ये राहिले असताना अनिलने युवतीवर वारंवार तिच्यावर बलात्कार केला. अशातच युवतीला गर्भधारणा झाली. परंतु, अनिलनने तिचीगरोदर माता म्हणून नोंद केली नाही. दरम्यान प्रसूतीची वेळ जवळ आल्याने अनिलने तिला शासकीय रूग्णालयात प्रसूतीसाठी दाखल केले. याबाबत माहिती मिळताच गावातील आशा वर्करने रूग्णालयात जाऊन पाहणी केल्यानंतर याबाबत अनिल विरोधात धारणी पोलिस ठाण्यात तक्रार दिली. याबाबत पोलिसांनी अनिल विरोधात बलात्कार व पोस्को ॲक्ट अंतर्गत गुन्हे दाखल केले असून पोलिस पुढील तपास करित आहेत.

# ....जर सरकारने आधारभूत किंमत वाढवली, तर उत्पादित डाळींचे भाव वाढण्याची शक्यता

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२३ अमरावती :** केंद्र सरकारने तुरीच्या हमीदरात वाढ करून तो ८ हजार रुपये प्रति क्विंटल केला असला, तरी सरकारच्या आयात धोरणामुळे शेतकऱ्यांना तूर ७ हजार रुपयांपेक्षा कमी भावात विकावी लागत आहे. सरकारने तुरीची आयात ३१ मार्च २०२६ पर्यंत खुली ठेवली आहे. त्याचे परिणाम बाजारावर जाणवू लागले आहेत. सध्या तुरीचे भाव हमीभावापेक्षा १२ ते १५ टक्क्यांनी कमी आहेत. त्याचा फटका तूर उत्पादकांना बसत आहे.जर सरकारने आधारभूत किंमत वाढवली, तर उत्पादित डाळींचे भाव वाढण्याची शक्यता आहे. या हंगामासाठी तूरचा आधारभूत भाव ७ हजार ५५० आहे आणि सरकारने येत्या हंगामासाठी प्रति क्विंटल ८ हजार रुपये आधारभूत भाव जाहीर केला आहे. तर खुल्या बाजारात तूर ६ हजार ३०० ते ६ हजार ४०० या दराने विकली जात आहे. तूर आणि हरभऱ्याची आवक जानेवारीपासून सुरू होते. मे



महिन्यापर्यंत बाजारात तूर सात हजारांपेक्षा जास्त प्रति क्विंटलने विकली जात होती, ती आता ६३००-६४०० पर्यंत खाली आली आहे.

हरभऱ्याचीही परिस्थिती अशीच आहे. चालू आर्थिक वर्षासाठी हरभऱ्याची आधारभूत किंमत ५६५० आहे परंतु खुल्या बाजारात हरभरा ५२५० या दराने विकला जात आहे. एप्रिल-मे महिन्यात कारखाना मालक त्याच्या क्षमतेनुसार कच्चा माल गोळा करतो. कारण पावसामुळे आवक विस्कळीत होते आणि मालातील ओलावा वाढतो आणि आधारभूत किमतीच्या आसपास विकला जाणारा माल त्याला वाजवी वाटतो आणि तो या वर्तुळात अडकतो, असे अमरावती कृषी उत्पन्न बाजार समितीचे माजी संचालक विनोद कलंत्री यांनी सांगितले.

सरकार आधारभूत किमतीवर खरेदी केलेल्या मालातील काही टक्के साठा राखीव ठेवते आणि काही काळानंतर उर्वरित माल बाजारभावाने विकते. त्यामुळे माल बाजारात येतो. सरकार तोटा सहन करू शकते. पण त्यात लघु उद्योगांचे मरण होते. नवीन उद्योगांच्या स्थापनेसाठी सरकार अनुदान देते पण सध्या अस्तित्वात असलेले किती उद्योग बंद पडत आहेत याचा अभ्यास करणे देखील आवश्यक आहे, असे मत विनोद कलंत्री यांनी व्यक्त केले.

# रविवारी पालकांकडून जोरदार शालेय साहित्य खरेदी



**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२३ अमरावती**

शहरासह जिल्ह्यातील शाळा आज सोमवारपासून सुरू झाल्या आहेत. शालेय साहित्याने बाजारपेठ सजली असून पालकही साहित्य खरेदीसाठी गर्दी करत आहेत. गतवर्षी पेक्षा यंदा शैक्षणिक साहित्य महागले असून २५ टक्क्यांनी दरवाढ झाली आहे. वाढत्या महागाईमुळे त्रस्त झालेल्या पालकांच्या खिशाला दरवाढीमुळे कात्री लागली आहे.रविवारी बाजारात शालेय साहित्य घेण्यासाठी चांगलीच गर्दी केली होती.

### कच्च्या मालाच्या किमती वाढल्याने शालेय साहित्यासह गणवेश महागले

सामान्यतः कच्चा माल, पेट्रोल व डिझेल यांचे भाव वाढल्याने यावर्षी शालेय साहित्यही महाग झाले असल्याचे सांगण्यात येत आहे. पुस्तके, गाईड, वर्क बुक्स सोबतच वह्या, दफ्तर, जेवणाचे आकर्षक डबे आणि वॉटर बॅग्ज अशा साहित्याने बाजारपेठ सजली आहे. कच्च्या मालाच्या किमती वाढल्याने उत्पादक कंपनीने दरात काही प्रमाणात वाढ केली आहे. दरवर्षी शालेय साहित्य दरवाढीचा सामना पालकांना करावा लागत आहे.शासकीय, खासगी शाळेतील गणवेशाचे दर सरकारी, खासगी व इंग्रजी माध्यमांचे गणवेश वेगवेगळे असतात. त्याचे दरही दर्जानुसार ठरतात. शहरातील कापड दुकानात मराठी शाळांचे गणवेश ३०० ते ६०० रुपयांपर्यंत तर इंग्रजी शाळांच्या गणवेशाचे किमान ५०० ते अडीच हजार रुपयांपर्यंत आहेत. गतवर्षीपेक्षा गणवेशाच्या किमतीत दुपटीने वाढ झाली आहे.

# ग्रामीण पोलीस दलातील ३१ अधिकाऱ्यांच्या प्रशासकीय बदल्या

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२३अमरावती-** ग्रामीण पोलीस दलातील ३२ अधिकाऱ्यांच्या शनिवारी रात्री प्रशासकीय अंतर्गत बदल्या करण्यात आल्या आहेत. यामध्ये सात पोलीस निरीक्षकांसह २४ एपीआय अशा एकूण ३१ अधिकाऱ्यांच्या बदल्या पोलीस अधीक्षक विशाल आनंद केल्या आहेत. यामध्ये पीआय अवतारसिंग चव्हाण यांची धारणी, पीआय सुरज बोंडे यांची मोर्शी तर पीआय अजय जाधव यांची चांदूरबाजार ठाणेदार म्हणून बदली करण्यात आली आहे.

ग्रामीण पोलीस दलातील वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या बदला होणार होत्या, परंतु काही कारणामुळे सर्वांच्या बदल्या पुढे ढकलण्यात आल्या होत्या. यामध्ये पीआय श्रीराम लांबाडे यांची नांदगाव खंडेश्वर, राहुल आठवले यांच्याकडे प्रभारी पोलीस उपअधीक्षक मुख्यालय, अजित राठोड यांची आर्थिक गुन्हे शाखा आणि मोर्शीचे ठाणेदार नितीन देशमुख यांची नियंत्रण कक्षात बदली करण्यात आली आहे. तसेच २४ एपीआयचीसुद्धा बदली करण्यात आली आहे. यामध्ये बेनोडा



येथील ठाणेदार ज्ञानेश्वर फड यांची एसीबीला बदली झाल्यामुळे त्यांच्याजागी येवदाचे ठाणेदार विवेक देशमुख यांची बदली करण्यात आली. तसेच प्रशांत जाधव यांची परतवाडा चावरुन ब्राम्हणवाडा थडी, प्रफुल्ल गाडेकर वरुड येथून येवदा, किरण औटे तळेगाव दशासर, श्रीकांत कडू एलसीबीमधून माहुली जहांगीर येथे बदली करण्यात आली. तसेच प्रियंका भोयर यांची भरोसा सेल, रामेश्वर धोंडगे चांदूररेल्वे, उल्हास राठोड चांदूरबाजार, राहुल जाधव वरुड, राहूल गवई मोर्शी, प्रशाली काळे अंजनगाव सुर्जी, सुमिता चोरघे मोर्शी, रामकृष्ण सोनवणे दर्यापूर, अमन सिरसाट अप्पर पोलीस अधिक्षकांचे वाचक, गजानन गजभारे दत्तापूर, सारंग बोम्पीलवारएटीएस, सुरज तेलगोटे अंजनगाव सुर्जी, वर्षा खरसान अर्ज शाखा, अमोल मुडे तिवसा, प्रकाश पाटील सीसीटीएनएस व डायल ११२, ईश्वर वर्गे अचलपूर, संध्या चव्हाण धारणी, राजेन्द्र मुंढे नांदगाव खंडेश्वर आणि प्रवीण पाटील यांची चिखलदरा येथे बदली करण्यात आली आहे.

# अमरावती विभागातून धावणार १७५ पंढरपूर यात्रा बसेस

## २ ते १३ जुलै २०२५ दरम्यान नियोजन

**विदर्भ प्रजासत्ताकदि.२३ अमरावती** -पंढरपूरला आषाढी एकादशीला राज्यभरातून लाखो



भाविक येतात. अनेक प्रवाशी स्वतःच्या खाजगी वाहनाने, रेल्वेने, एसटीने अथवा - विविध पालखीं बरोबर चालत येतात. दरवर्षी प्रमाणे यावर्षी सुद्धा प्रवाशांना एसटीने अमरावतीसह विभागातील ८ आगारातून पंढरपूर बस सेवा उपलब्ध करून दिली आहे. भाविकांसाठी एसटीने २ जुलै २०२५ ते १३ जुलै २०२५ दरम्यान यात्राकाळात अमरावती विभागातून १७५ विशेष यात्रा बस सोडण्याचे नियोजन केले आहे. परंतु मागणी आल्यास आणखी बस उपलब्ध करण्याची एसटीची तयारी आहे. यंदा राज्यातील कोणत्याही गावातून४० भाविक असल्यासअथवा त्याहून जास्त भाविकांनी एकत्रित मागणी केल्यास त्यांना थेट पंढरपूरला जाण्यासाठी तेथूनच बस उपलब्ध करुन दिली जाणार आहे. त्यासाठी भविकांनीजवळच्या आगारात संपर्क करायचा, असे आवाहन करण्यात आले आहे.या योजनांची सवलत लागू राहणार पंढरपूर यात्रे दरम्यानही प्रवाश्यांना शासनाने लागू केलेली सवलत लागू राहणार आहे. त्यानुसार ७५ वर्षावरील ज्येष्ठांना मोफत प्रवास, ६५ ते ७५ वर्षाखालील ज्येष्ठांसह महिलांना ५० टक्के सवलत लागू राहणार असल्याचेही महामंडळाने कळवले आहे.या आगारातून जाणार बसेसएसटी महामंडळाने अमरावती विभागातील अमरावती, बडनेरा, परतवाडा, वरुड, चांदुर रेल्वे, दर्यापूर, मोर्शी आणि चांदुर बाजार या आगारातून पंढरपूरला जाण्यासाठी २ जुलै ते १३ जुलै दरम्यान १७५ बसेसचेआगारातून २९ बसेस, बडनेरामधून २५ बसेस, परतवाडावरून २६ बसेस, वरुडमधून २० बसेस, चांदुर रेल्वे मधून १५ बसेस, दर्यापूरमधून २० बसेस, मोर्शीतून २० बसेस, आणि चांदुर बाजारमधून २० बसेसचे नियोजन केल्याची माहिती आहे. वर्ष २०२४ मधील आषाढी यात्रेसाठी अमरावती विभागातून १४८ बसेसचे नियोजन होते. यंदा बसेसची संख्या २७ने वाढवून १७५ करण्यात आली आहे.

### पंढरपुरला चार तात्पूरती बस स्थानके उभारणार

वारकरी, भाविक तसेच पर्यटकांची होणारी गर्दी पाहता एकाच स्थानकावर गदर्दी होऊ नये यासाठी प्रवाशांच्या सोयीसाठी यात्रा कालावधीत पंढरपूर येथे चंद्रभागा, भीमा, पांडुरंग (आयटीआयकॉलेज) वविठ्ठल कारखानायात्रा स्थानक अशी चार तात्पुरतो बस स्थानके उभारण्यात येणार आहेत. यात्रा काळात बसस्थानकावर पिण्याचे पाणी, सुलभशौचालय, संगणकीय आरक्षण केंद्र, चौकशी कक्ष, मार्गदर्शक फलक अशा विविध सोयी सुविधा पुरविण्यात येणार असल्याचेही महामंडळाने रुळवले आहे.

# शिरजगाव मोझरी मधील शेतकऱ्यांना बोगस बियाण्यांचा फटका

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२३शिरजगावं मो.**

तिवसा तालुक्यातील शिरजगाव, मोझरी,अनकवाडी येथील शेतक-यांनी बापना कंपनीच्या सोयाबीनची पेरणी केली.परंतु गेल्या पंधरा दिवसांपासुन हे बियाणे उगवलेच नाही.त्यामुळे बोगस बियाण्यांची बाजारात मोठ्या प्रमाणात विक्री होत असल्याचे दिसुन येत आहे. शिरजगांव मो. येथील बऱ्याच शेतक-यांनी भरघोस उत्पादनाच्या हमीवर यंदा बापना कंपनीच्या सोयाबीनची पेरणी केली. सर्रास शेतक-यांनी लॉट नं.०००७८९ क्रमांकाच्या सोयाबीन बियाण्याची खरेदी



केली.परंतु हा लॉट नंबरच बोगस निघाल्याने शेतक-यांच्या आशेवर पाणी फेरल्या गेले असुन शेतक-यांवर दुबार पेरणीचे संकट ओढवले आहे. रविवारी सकाळी सर्व शेतकरी आपापल्या शेतात गेले असता त्यांना शेजारच्या शेतक-यांनी पेरणी केलेले सोयाबीन उगवलेले दिसले.मात्र ज्या शेतक-यांनी बापना कंपनीचे सोयाबीन पेरले त्यांच्या शेतात दाणाही उगवलेला दिसला नाही.या बियाण्याने जवळपास साठ हेक्टर क्षेत्रफळ बाधीत झाले असुन शेतक-यांवर सुरुवातीलाच आर्थिक संकट कोसळले आहे. सर्व शेतक-यांनी एकत्र येऊन बियाणे विक्रेता व कंपणीचे एरिया मॅनेजर यांना शेतात बोलावून वस्तुस्थिती दाखविली.तेव्हा बियाण्यांमध्ये दोष असल्याचे मान्य करुन शेतक-यांना दोन दिवसात नुकसान भरपाई देणार असल्याचे कंपणीकडुन आश्वस्त करण्यात आले.

### प्रति सोयाबीन बॅगसाठी येणारा खर्च

| | |
|---|---|
| शेती मशागत | २००० |
| बापना सोयाबीन बॅग | ३२०० |
| बियाणे बुरशीनाशक | ४०० |
| सल्फेट १ | १४५० |
| सल्फर खत | ६२० |
| तूर १एकर | १५०० |
| पेरणीयंत्र १एकर | १००० |
| सुमी मॅक्स | ९३० |
| मजुरीखर्च | १५०० |
| एकूण खर्च | १२६०० |

# स्मार्ट मिटर बसविण्यास नागरिकांचा विरोध

## सातेगाव येथे फसवणूक व भीती दाखवून मिटर लावल्याची तक्रार

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२३ अंजनगाव सुर्जी (सातेगाव)-** विज महावितरण कंपनीने राज्यातील सर्व ग्राहकांना स्मार्ट प्रीपेड मीटर लावण्याची घोषणा केली आहे. तसेच हे मीटर कंपनीच्या खचनि लावणार अशी खोटी व दिशाभूल करणारी जाहिरात करण्यात आली. अंजनगाव सुर्जी तालुक्यात सार्वत्रिक स्मार्ट मीटर बसविण्याची मोहीम सुरू झाली असून मिटर लावण्याला सातेगावात विरोध होत आहे.ग्राहकांना भीती दाखून आपले मीटर फाल्टी, नादुरुस्त आहे व ते बदलवायचे आहे, अशी बतावणी करून स्मार्ट मीटर बसवण्याचे षडयंत्र सुरु असून सातेगाव येथे हे स्मार्ट मिटर बसविताना ग्राहाकांच्या संमतीशिवाय मीटर बसविण्यात येत आहेत. खासगी कंपनीचे कर्मचारी झोपडपट्टीतीलरहिवाशी, भूमिहीन, वीज ग्राहकांना सक्तीने मीटर बसवत आहेत. याबाबत शिवसेना (उबाठा) गटाचे पं.स. माजी उपसभापती महेश खारोळे यांनी जिल्ह्याचे खासदार, आमदार, तहसीलदार, वीज वितरण कंपनीकडे तक्रार दाखल केली आहे.या विरोधात आमसभा बोलावून स्मार्ट मिटर काढून साधे मिटर व ग्राहकांची फसवणूकथांबविण्याची मागणी केली. याबाबत ग्रामस्तरावर मिटर लावू न देण्याची मुनादी देत या संबंधात तक्रार अर्ज दाखल करण्याची विनंती करण्यात आली आहे.



मातगाव येथे ४० ते ५० गोरगरीब नागरिकांना भीती दाखवून मीटर बसविण्यात आले आहे. मुख्यमंत्री यांनी सामान्य ग्राहकांसाठी स्मार्ट मीटर लागणार नाहीं असे आदेश दिले होते. मीटरची किंमत वीज बिलातून वसूल केली जाणार आहे. त्यामुळे ग्रामपंचायतने आमसभा बोलावून लावलेले मीटर त्वरित काढून साधे मीटर लावावे व वीज ग्राहकांची फसवणूक थांबवावी, अशी मागणी आमसभेत करणार आहे.**- महेश खारोळे,** पं.स.चे माजी उपसभापती सातेगाव

# ऑटो चालकाच्या घरी ५ लाख ३० हजार रुपयांची चोरी

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि२३वरुड -** शहराच्या पार्टीरोड परीसरातील साक्षी विहार कॉलनीतील एका ऑटो चालकाच्या घरात अज्ञात चोरट्यांनी घरफोडी करून ५ लाख ३० हजार रुपायांचा मुद्देमाल लंपास केला. याप्रकरणी वरुड पोलिसांत तक्रार दाखल केत्यानंतर पोलिसांनी अज्ञात आरोपी विरोधात गुन्हा दाखल केला आहे.

पोलिस सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, रमेश किसन सुरजुसेहे आपल्या कुटुंबियांसह १७ जून रोजी दोन दिवसांकरीता घराला कुलूप लावून राजुराबाजार येथे गेले होते. याच दरम्यान अज्ञात चोरट्याने संधी साधुन त्यांच्या घराचे कुलूप तोडून घरात प्रवेश केला. आणि घरातील एका पेटीत ठेवलेले ५ लाख ३७हजार



रुपयांचे सोन्याचे दाग दागिन्यासहरोख रक्कम लंपास केली. यामध्ये ८० हजार रुपये किंमतीची एक तोळ्याची सोनसाखळी ८० हजार रूपये किंमतीची एक तोळ्यांची सोन्याची अंगठी, ४८ हजार रुपये किंमतीची एक ६ ग्रॅम सोन्याची अंगठी, १ लक्ष २० हजाररुपये किंमतीचे १५ ग्रॅमचे ११५ सोन्याचे मणी, १ लख ६० हजार रुपये किमतीचे एक सोन्याचे मंगळसूत्र असे एकूण ६१ ग्रॅम सोन्याचे आभूषण व ४२ हजार रुपये रोख असा एकूण ५ लाख ३० हजार रुपये किंमतीचा मुद्देमाल चोरून नेला. १९ जून रोजी रमेश सुरजुसे घरी परत येताच त्यांना घरात चोरी झाल्याचे आढळून आले .

त्यानंतर त्यांनी लगेचच वरुड पोलिस स्टेशनला याची तक्रार दाखल केली.पोलिसांनी घटनास्थळाचा पंचनामा करीत अज्ञात चोरट्या विरुद्ध घरफोडी संदभांत विविध कलमांतर्गत गुन्हा दाखल केला. या प्रकरणी ठाणेदार अर्जुन ठोसरे बाचे मार्गदर्शनाखाली वरूड पोलिन पुढील तपास करीत आहे.

# अपघाताचा केला बनाव ४.५० लाखांची ६५ क्विंटल तूर चोरी

## तळेगाव दशासर हद्दीतील घटना, तिन आरोपींवर गुन्हा दाखल

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२३तळेगाव दशासर -** ट्रकला अपघात झाल्याचा बनाव करून ६५ क्विंटल तुर चोरी केल्याची धक्कादायक घटना तळेगाव दशासर पोलिस ठाण्याच्या हद्दीतील देवगाव फाट्यावर उघडकीस आली आहे. या प्रकरणात तिघांविरुद्ध फसवणुकीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.तक्रारकर्ते शंकरलाल अशोककुमार उधानी (वय ४९, रा. मलकापूर, जि. बुलढाणा) यांनी तक्रार दिली असून, त्यांच्या मालकीची तुरीची ३०३.९० क्विंटलची एकूण ६०० कट्ट्यांची मालवाहतूक एमएच-२६-एडी-४२११ क्रमांकाच्या ट्रकमधूनमध्यप्रदेशातील बरगाम (कटनी) येथीलजयकिसान इंडस्ट्रीज येथे पाठवण्यात आली होती. १८ जून रोजीतिन्ही आरोपीट्रकमध्ये तुरीचे कट्टेलोडकरूनरवानाझाले होते. मात्र, ट्रक चालक दानीषोउद्दीन अलीमोउद्दीन पठाण (२९), रहिम गुलखान नजर खान (३०)





आणि अल्ताफखान मुस्तफा खान पठाण (२५, तिघेही रा. रिसोड, जि. वाशिम) यांनी देवगाव फाट्याजवळ ट्रकला अपघात झाल्याचा बनावरचला. या बनावाआड आरोपींनी तब्बल १३० कट्टे तुर, म्हणजेच सुमारे ६५ क्विंटल माल, ज्याची अंदाजे किंमत ४ लाख ५० हजार रुपये आहे, तो चोरून नेल्याचे उघड झाले. या प्रकरणी तळेगाव दशासर पोलिस ठाण्यात फसवणूक व विश्वासघातासह संबंधित कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून, पोलीस याप्रकरणी युद्धपातळीवर तपास करत आहेत.

# काहो साहेब... दोन टोलचे पैसे तुम्ही घेणार मग रस्त्यावरील भेगा कधी बुजवणार?

## लेहेगाव – शिरखेड रस्त्यावर पडल्या जीवघेण्या भेगा

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२३ मोर्शी**

नांदगाव पेठ ते पांढुर्णा या महामार्गाची निर्मिती व सिमेट कॉंक्रिटीकरण काही वर्षापूर्वी करण्यात आली आहे. या रस्त्याच्या कामावर कोटी रुपयांचा खर्च सुद्धा झाला. या रस्त्यावर निभी येथे टोलसुद्धा लावण्यात आलेला आहे; परंतु लेहगाव ते शिरखेड या मार्गावर या रस्त्याच्या मधोमध मोठमोठ्या भेगा पडल्याने अपघात होण्याची शक्यता मोठ्या प्रमाणात बळावली आहे, तर टोल घेत असल्याने आम्हाला रस्तातरी सुरळीत द्या, असे म्हणण्याची वेळ मोर्शीकरावर आली आहे.



नांदगाव पेठ ते पांढुर्णा या रस्त्याचा भाग काळ्या जमिनीचा असल्याने खाली पूर्णतः माती आहे. त्यामुळे बांधकामाच्या वेळी पाणी व्यवस्थापनाकडे लक्ष न दिल्याने कॉंक्रीट मजबूत होण्याऐवजी आकुंचित झाले. खाली माती असल्याने व ओव्हरलोड गाड्या धावत असल्याने तसेच तापमानातील बदलामुळे शिरखेडनजीक रोडच्या मधोमध मोठमोठ्या भेगा पड्त्या आहेत.रस्ता बांधकाम जोडमध्ये ६ ते १५ इंच भेगा पडलेल्या आहे. त्यामुळे आतील गिट्टी व कॉंक्रीट निघत असल्याने भेगांची खोलीही वाढत आहे.या भेगांमधून दुचाकी गेल्यास ती गाडी स्लिप होऊन अपघात होण्याची शक्यता बळवली आहे. नुकतेच या रस्त्यावर एक मुलगा व त्याची आई दुचाकीने मोर्शी येथे जात असताना या भेगातूनच दुचाकी स्लिप झाल्याने त्या महिलेच्या डोक्याला गंभीर जखम झाली असल्याने तिला रुग्णालयात भरती करण्यात आले होते. त्याचबरोबर चारचाकी गाडी ओव्हरटेक करताना या भेगेतून गाडीचे ठाक गेल्यास वाहनचालकाचे नियंत्रण जाऊ शकते व त्यामुळे अपघात घडू शकतो. या मार्गात्तर शिरखेड़ लेहेगाव निंभी दरम्यान आजपर्यंत अनेक अपघात होऊन वाहनचालकांचा बळी गेला आहे. महामार्ग प्रशासन मार्गावरील भेगा धातूरमातूर पध्दतीने बुजविण्याचा प्रयत्न करीत आहेत. परंतु आणखी मोठ्याप्रमाणावर भेगा पडलय आहे.मागील अनेक महिन्यांपासून या रस्त्यावरील लेहगाव ते शिरखेड येथे मोठमोठ्या भेगा पडल्या असल्या तरी त्याची साधी दखल घ्यायला व कामाची चौकशी करायला कुणी तयार नाही. रोहठी वेळीच दुरुस्ती केली जात नसल्याने या रोडवर जखमा व मरण स्वस्त झाले की काय, असा प्रश्न पडला आहे.

# बांधिलकी प्रतिष्ठान तर्फे कविसंमेलन तसेच ऋणनिर्देश सोहळा उत्साहात संपन्न

## पावसाच्या कवितांनी भरली सोहळ्यात रंगत

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२३ अमरावती**

बांधिलकी प्रतिष्ठान अमरावती द्वारा आयोजित पहिले राज्यस्तरीय बांधिलकी साहित्य संमेलन अमरावतीच्या भूमीत ३०/५/२०२५ रोजी अतिशय यशस्वीरित्या पार पडले. राज्यभरातून अनेक नामवंत साहित्यिकांच्या गौरवांकित प्रतिक्रिया आयोजकांना प्राप्त झाल्या होत्या. हे संमेलन यशस्वी करण्यासाठी राबणाऱ्या आयोजन समितीतील सहयोगी सदस्यांचा सत्कार करून त्यांचे आभार व्यक्त करण्यासाठी संस्थेच्या संस्थापक अध्यक्षा ड.डॉ. नीता प्रफुल्ल कचवे यांनी बांधिलकी प्रतिष्ठानतर्फे या ऋणनिर्देश तसेच कविसंमेलन सोहळ्याचे आयोजन हॉटेल खाना खजाना वलगाव रोड, अमरावती येथे केले होते. ऋणनिर्देश सोहळा तसेच कविसंमेलनाच्या अध्यक्षस्थानी संवेदना




बहुद्देशीय संस्थेचे संस्थापक अध्यक्ष व सुप्रसिद्ध वऱ्हाडी कवी गजानन काकडे हे होते . प्रमुख अतिथी म्हणून उद्योजक श्री. हरिदासजी उल्हे,मा.कांचनताई उल्हे, मा. शीतलताई महल्ले,मा. माधव रेखे, मा. मनोज भांदर्गे, मा. प्रदीप भांदर्गे,मा. अमोल वारकरी तसेच सुप्रसिद्ध गझलकार तसेच वार्ताहार विशाल कन्हेरकर, संपादक साहित्य प्रवाह आदि मान्यवर उपस्थित होते. या कार्यक्रमाचे स्वागतगीत छाया गजेंद्र पाथरे यांनी आपल्या सुमधुर आवाजात सादर करून सोहळ्याची शानदार सुरुवात केली.त्यानंतर ड. डॉ.नीता कचवे यांनी आपल्या प्रस्ताविकातून संमेलनाच्या यशस्वीतेसाठी राबणाऱ्या आयोजन समितीतील सदस्यांचे मनापासून आभार व्यक्त केले. या प्रसंगी बांधिलकी प्रतिष्ठानच्या सदस्यांचा उपस्थित मान्यवरांच्या हस्ते सन्मानचिन्ह व ग्रंथ देऊन सत्कार देखील करण्यात आला.

त्यानंतर कविता पावसाच्या हा कविसंमेलनाचा कार्यक्रम अतिशय रंगतदार झाला.यामध्ये वऱ्हाडी कवी गजानन काकडे, खुशाल गुल्हाने, कांचनताई उल्हे,छाया पाथरे, गजेंद्र पाथरे ,सीमा भांदर्गे, वर्षा भांदर्गे, अंजली वारकरी, हेमा राऊत,विशाल मोहोड,विकास राऊत, विशाल कन्हेरकर,अजय अडीकने, अबोली अडीकने, सुयोग राजनेकर,राजेश चौरपगार, नयन पऱ्हाड व जयश्री बोडखे आदि सर्व कविंनी आपल्या पावसावरील बहारदार रचना सादर करून उपस्थितांना चिंब भिजविले. या यशस्वी सोहळ्याचे बहारदार सूत्रसंचालन अंजली वारकरी यांनी तर आभार प्रदर्शन खुशाल गुल्हाने यांनी केले. त्यानंतर सुग्रास जेवणाने सोहळ्याची यशस्वी सांगता झाली.

# ४१ दिवसांपासून सुरू असलेल्या धरणे आंदोलनाकडे जिल्हा प्रशासनाने दुर्लक्ष

## आता सहकुटुंब करणार आमरण उपोषण करण्याच्या तयारीत



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२३अमरावती**

घरासमोर असलेला सरकारी रस्ता अतिक्रमण करून बांधकाम केल्याने जाण्याचा रस्ता बंद झाल्यामुळे आर्थिक नुकसान होत असल्यामुळे अतिक्रमण हटविण्याच्या मागणीकरिता मागील ४१ दिवसांपासून एक कुटुब जिल्हाधिकारी कार्यालयासमोर धरणे आंदोलन करीत आहे.

परंतु जिल्हा प्रशासनाने या आंदोलनाची दखल अद्यापही घेतलेली नाही आणि गटविकास अधिकाऱ्यांच्या आदेशाला ग्रामपंचायतीने केराची टोपली दाखविली आहे. अमरावती तालुक्यातील शिराळा येथील नसरीन बानो यांचे कुटुंब त्यांच्या पूर्वजांपासून शिराळा येथे राहत आहे त्यांच्या घरासमोर असलेला पूर्वीपासूनवा जुना रस्ता ग्रामपंचायत सदस्य ईसामुद्दीन मुनिरद्दीन व त्यांचे तीन भावांनी अतिक्रमण करून अडविला. रस्त्यावर अवैध बांधकाम करून नसरीन बानू यांच्या कुटुंबाचे जाणे येणे बंद केले.नसरीन बानू यांच्या कुटुंबाकडे चार चाकी वाहने आहेत त्यांचे भांडे विक्रीचा व्यवसाय असल्यामुळे वाहनात भांडे घेऊन जाणे शक्य होत नाही. त्यामुळे मागील चार महिन्यांपासून त्यांचा व्यवसाय ठप्प झाला आहे त्यामुळे त्यांचे आर्थिक नुकसान होत आहे. या नुकसानाला एकमेव जबाबदार असलेल्या ग्रामपंचायत सदस्य इसामुद्दीन मुनिरुद्धीन यांनी केलेले अवैध बांधकाम हटविण्यात यावे, या मागणीकरिता मागील ४१ दिवसांपासून त्या जिल्हाधिकारी कार्यालयासमोर धरणे आंदोलनाला बसलेले आहेत. यासंदर्भात गटविकास अधिकारी यांनी दिलेल्या आदेशाला ग्रामपंचायत सरपंच व सचिव यांनी केराची टोपली दाखविली आहे. न्याय मिळेपर्यंत धरणे आंदोलन सुरूच राहील. न्याय न मिळाल्यास आंदोलन तीव्र करण्यात येईल व संपूर्ण कुटुंब आमरण उपोषण करणार, असा इशारा त्यांनी दिला आहे.सरकारी रस्त्यावर केलेल्या अतिक्रमणाची तक्रार वारंवार करून प्रशासनाने दखल घेतली नाही, तसेच गटविकास अधिकारी यांनी दिलेल्या पत्राला ग्रामपंचायत सरपंच व सचिवाने न जुमानता अतिक्रमण हटविले नसल्यामुळे न्याय मिळेपर्यंत आंदोलन सुरूच राहणार असल्याचे नसरीन बानो यांनी सांगितले.

# मुलीला जिवे मारण्याची धमकी युवकाची तुरूंगात रवानगी

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२३तिवसा**

दोन वर्षांपासून ओळख झाल्यानंतर जेव्हा मुलीने लग्नाला नकार दिला. तेव्हा आरोपी मुलाने तिला माझ्याशी लग्न न केल्यास जिवे मारण्याची धमकी दिली. वडिलांनी मध्यस्थी केली, तर त्यांनाही मी सोडणार नाही, अशी धमकी देणारा आरोपी अनिरुध्द सुभाष झटाले (२५) रा. लुंबिनीनगर तिवसा याच्याविरुध्द पोलिसांनी गुन्हा दाखल करून त्याला अटक केली आहे.




आरोपी अनिरुध्द झटाले याची २१ वर्षीय मुलीशी गेल्या दोन वर्षापूर्वी ओळख झाली होती. तेव्हापासून त्यांचे फोनवर बोलणेसुध्दा सुरू होते. संबंध चांगले असल्याने अनिरुध्दने मुलीसमोर लग्नाचा प्रस्ताव ठेवला होता; परंतु नंतर मात्र मुलीने मी तुझ्यासोबत लग्न करू शकत नाही, असे सांगून त्याच्याशी बोलणे बंद केले होते. तेव्हापासून आरोपी अनिरुध्द हा मुलीला वेगवेगळ्या मोबाईलवरून फोन करून तू माझ्याशी बोलत का नाही, माझ्याशी संबंध ठेव नाहीतर तुला मारून टाकील, अशा धमक्या देत होता. १६ जून रोजी सकाळी साडेअकरा वाजताच्या सुमारास अनिरुध्दने तिचा पाठलाग करून बोलणे बंद का केले, असे विचारले. तेव्हा मुलीने म्हटले की, मला तुझ्यासोबत बोलायचे नाही, तू येथून निघून जा. तेव्हा त्याने म्हटले की, तू जर माझ्याशी संबंध ठेवले नाही तर तुला मारून टाकील, तुझे वडील मधे आल्यास त्यांनाही सोडणार नाही, अशी धमकी दिली. याघटनेची तक्रार मुलीने तिवसा पोलिसांत दाखल केली असता पोलिसांनी आरोपी अनिरुध्द झटाले विरुध्द गुन्हे दाखल करून अटक केली आहे. २१ जूनरोजी त्याला न्यायालयात हजर केले असता न्यायालयाने त्याची तुरुंगात रवानगी केली आहे.

# जिल्ह्यातील ग्रामीण भागात 'मनरेगा' च्या कामांमुळे मजुरांच्या हाताला मिळाले काम

## ७६५ ग्रामपंचायतींमधील ६,९४० कामांवर ४१,७२३ मजुरांना काम

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२३अमरावती**

यंदा २१ जून उजाडला तरी पेरणीयोग्य पाऊस नाही, त्यामुळे पेरणी खोळंबली आहे. अशा परिस्थितीत जिल्ह्यातील ७६५ ग्रामपंचायतींमध्ये सुरू असलेली 'मनरेगा'ची ६,९४० कामे उपलब्धी ठरली आहे. सद्यःस्थितीत ४१,७२३ मजुरांच्या हाताला काम मिळाले आहे. यामध्ये चिखलदरा व धारणी या तालुक्यात सर्वाधिक १२,९१६ मजुरांच्या हाताला काम मिळाले आहे.



जिल्ह्याच्या ग्रामीण भागात 'मनरेगा'च्या कामांमुळे मजुरांच्या हाताला काम मिळाले आहे. त्यामुळे कामाच्या शोधात मजुरांची भटकंती व स्थलांतर टळले व गावाच्या परिसरातच त्यांना रोजगार उपलब्ध झाला आहे. मेळघाटातील आदिवासी कामाच्या शोधात मोठ्या प्रमाणात स्थलांतरित होतात. मात्र मग्रारोहयोच्या कामांमुळे हे चित्र पालटले आहे. या योजनेंतर्गत पहिल्या १०० दिवसांचा रोजगार हा केंद्र शासनाकडून उपलब्ध केला जातो तर उर्वरित दिवसांचा रोजगार हा राज्य शासनाकडून दिला जातो. शिवाय या वर्षी या कामांवरील मजुरीतदेखील वाढ झाल्याने मजुरांची संख्या वाढली आहे. आता पुन्हा वृक्षारोपणाची कामे सुरू होत असल्याने पावसाळ्याच्या दिवसात रोजगार उपलब्ध होणार आहे.या योजनेद्वारे मजुरांना भर पावसाळ्यात सुरू असलेल्या ६,९४० कामांवर रोजगार उपलब्ध झालेला आहे. उन्हाळ्यात ९ हजारांवर कामे जिल्ह्यात सुरू होती, पावसाळ्यामुळे काही कामे बंद झाली.

# बाजार समितीच्या सचिवावर गुन्हा


**विदर्भ प्रजासत्ताक दि.२३अमरावती :** येथील कृषी उत्पन्न बाजार समितीचे सचिवांनी एका शेतकऱ्याला मोबाइलवरून जिवे मारण्यासह कुटुंबाला संपविण्याची धमकी दिल्याप्रकरणी वलगाव पोलिसात १९ जून रोजी एनसीआर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. दीपक केशव विजयकर असे आरोपीचे नाव आहे.एफआयआरनुसार गणेश कडू हे १९ जून रोजी नया अकोला येथील शेतामध्ये असताना दुपारी १२.३५ वाजता दीपक विजयकर यांच्या मोबाइल नंबरहून त्यांना ३० ते ४० कॉल आले. कडू यांनी कॉल उचलले, तेव्हा बाजार समितीचे सचिव दीपक विजयकर यांनी माझ्या तक्रारी तूच करून राहिला, अश्लील शिवीगाळ करीत जिवे मारून टाकीन व तुझ्या संपूर्ण कुटुंबाला मिटवण्याची धमकी दिली. यावर गणेश कडूने तत्काळ वलगाव पोलिस स्टेशन गाठून तक्रार नोंदवून गुन्हा दाखल केला. गणेश कडू हे अमरावती कृषी उत्पन्न बाजार समितीचे माजी उपसभापतीसुद्धा होते. ते बाजार समितीचे दीर्घकाळ संचालक होते. बाजार समितीचे सचिव दीपक विजयकर यांनी गणेश कडू यांना जिवे मारण्याची धमकी का दिली, याबाबत पोलिस तपास करीत आहेत.

# पिक जळून गेल्यावर डीपी दुरुस्त करणार का हो साहेब!

## पंधरा दिवसांपासून डीपी नादुरुस्त; शेतकऱ्यांच्या मागणीकडे महावितरण कंपनीचे दुर्लक्ष

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२३शिंदी बु.**

अचलपूर तालुक्यातील मौजा भिलोना येथील रवी पाटील यांच्या शेतातील डीपी पथरा दिवसांपासून नादुरुस्त आहे. शेतकऱ्याने दुरुस्तीची मागणी वारंवार करूनही हरम कनिष्ठ अभियंता कार्यालय येथील विद्युत वितरण कंपनीच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांनी दुर्लक्ष केले. अशात पावसाने दडी मारल्याने




पेरलेलल्या पिकांना पाण्याची आवश्यकता आहे. त्यामुळे पाण्याअभावी पिके पिके करपू लागली आहे मौजा भिलोना येथील रवी पाटील यांच्या शेतातील डीपी पंधरा दिवसांपासून नादुरुस्त आहे. यामुळे शेतातील विहिरी व बोअरवेलमधील विद्युत पंपासाठीविद्युत वितरण कंपनीकडून अधिकृत वीजपुरवठा घेतला आहे; मात्र त्यांच्या डीपी मागील पंधरा दिवसांपासून नादुरुस्त आहे. त्यामुळे बोरवेल, विहिरीतील पाणी पिकांना देता येत नाहीत. ही डीपी दुरुस्त करावी, याकरिता येतील शेतकऱ्यांनी वारंवार विद्युत कपनीकडे मागणी केली; मात्र त्यांच्या या मागणीकडे दुर्लक्ष केल्याने त्यांच्या शेतातील पिके करपू लागली आहेत. यामुळे संबंधित विभागाने त्वरित डीपी दुरुस्त करावी, अशी मागणी शेतकऱ्यांनी केली आहे.

# टाकरखेडा संभू - आष्टी रस्त्यावर बंगाली काटेरी झाडे देत आहे अपघाताला आमंत्रण


**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२३टा.संभू**

टाकरखेडा संभू ते आष्टी मार्गावरील मुख्य रस्त्यावर गेल्या अनेक वर्षापासून दुरुस्तीचा अभाव असून रस्ता खड्यांमुळे आधीच धोकादायक बनला आहे. या खराब रस्त्याच्या समस्येत आता आणखी भर पडली आहे. बंगाली काटे नावाच्या काटेरी झाडांची वाढ इतकी झाली आहे की काही ठिकाणी ती थेट रस्त्यावर आलेली आहेत.



या झाडांमुळे वाहनचालकांच्या मार्गात अडथळा येत असून अनेक वेळा अपघाताचे प्रसंग निर्माण होत आहेत. विशेषतः रात्रीच्या वेळी अंधारात या झाडांचे अस्तित्वलक्षात न आल्यास वाहनचालक थेट झाडांवर आदळू शकतात. त्यामुळे या मार्गावरून प्रवास करणाऱ्याऱ्यांच्या जीवितास धोका निर्माण झाला आहे.स्थानिक नागरिकांनी बांधकाम विभागाचे याकडे लक्ष वेधण्याचा प्रयत्न केला असला तरी अद्याप कोणतीही ठोस उपाययोजना करण्यात आलेली नाही.स्थानिक प्रशासन आणि बांधकाम विभागाने तत्काळ पावले उचलून रस्ता साफ करावा, काटेरी झाडे हटवावी आणि रस्त्याची डागडुजी करावी, अशी जोरदार मागणी होत आहे.

# अमरावती सह जिल्ह्यातील सर्वच शाळा आजपासून गजबजल्या



**विदर्भ प्रजासत्ताक दि.२३अमरावती**

उन्हाळी सुट्टया संपल्यानंतर आज सोमवार, २३ जूनपासून नवीन शैक्षणिक सत्र सुरू झाले आहे. या पार्श्वभूमीवर महापालिकेच्या ६३ आणि जिल्हा परिषदेच्या दीड हजारावर शाळांसह शेकडो खासगी शाळांमध्ये किलबिल पहावयास मिळत आहे.शैक्षणिक सत्राच्या प्रारंभाला शिक्षणाधिकाऱ्यांसह शिक्षकांची शाळेत लगबग दिसून आली, हे विशेष.शाळेच्या पहिल्या दिवशी विद्यार्थ्यांचे स्वागत करण्यासाठी प्रवेशोत्सव साजरा करण्याचे आदेश शिक्षण विभागाने दिले आहेत. त्याअनुषंगाने सर्व शाळांनी विद्यार्थ्यांच्या स्वागताची शाळेत जोरदार तयारी केली होती.

शैक्षणिक सत्र २०२५–२६ ला आज सोमवारपासून प्रारंभ करण्यात आला आहे. शहरातील विविध शाळांना विविध उपक्रम राबविण्याच्या सूचना जिल्हा परिषदेच्या शिक्षण विभागाने दिल्या आहेत.शाळेच्या पहिल्या दिवशी सर्व विद्यार्थ्यांचे स्वागत फुले देऊन करण्यात आले त्याचप्रमाणे गावांमध्ये प्रभाग फेरीदेखील काढण्यात आली. मुख्याध्यापकांनी शाळा व्यवस्थापन समितीच्या सभेचे आयोजन करणे, शाळा स्वच्छता करणे, पहिल्या दिवशी विद्यार्थ्यांना गणवेश आणि पाठ्यपुस्तकांचे वितरण आदी बाबी करावयाच्या आहेत. शैक्षणिक सत्राचा पहिला प्रथम दिवस म्हणून शालेय पोषण आहारात गोड पदार्थाचा ही समावेश करण्यात आला होता.

## प्रत्येक शाळेत विद्यार्थ्यांचे जोरदार स्वागत










## वलगावच्या उर्दू जिल्हा परिषद शाळेत जिल्हाधिकारी आशिष येरेकर यांची भेट..

अमरावती जिल्ह्यातील सर्व जिल्हा परिषदेच्या शाळा उत्साहात सुरू झाल्या आहेत. पहिल्यांदा पहिल्याच दिवशी विद्यार्थ्यांना शाळेतच गणवेश व पुस्तके वाटप करण्यात आले, वलगावच्या उर्दू जिल्हा परिषद शाळेत जिल्हाधिकारी आशिष येरेकर यांनी भेट देत विद्यार्थ्यांचे स्वागत केलं.. यावेळी जिल्हाधिकाऱ्यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केलं, विकसित भारताची मुहूर्तमेढ शासकीय शाळांमधून रोवायची आहे असं आवाहन जिल्हाधिकारी आशिष येरेकर यांनी विद्यार्थ्यांना केलं, शिक्षक विद्यार्थ्यांना घडवण्याचं काम करतात मात्र पालकांनी देखील विद्यार्थ्यांवर लक्ष ठेवावे, मोबाईलचा अतिवापर टाळावा असं देखील आवाहन जिल्हाधिकाऱ्यांनी केलं.

## चांदूर रेल्वे चे गटसाधन केंद्र गोकुलधाम.....स्वागताला चंपक चाचा



दरवर्षी शाळा प्रवेशोत्सव हटके करण्यासाठी चर्चेत असलेल्या अमरावती जिल्ह्यातील चांदूर रेल्वे गटसाधन केंद्र यांनी यावर्षी शाळेलाच गोकुलधाम बनविले असून विद्यार्थ्यांच्या स्वागताला चंपक चाचा, जेठालाल,पत्रकार पोपटलाल,दयाबेन,डॉ.हाथी , आत्माराम तुकाराम भिडे, रोशनसिंग सोडी आदी कलाकारांनी हजेरी लावली यावेळी गटसाधन केंद्रातील कर्मचाऱ्यांनी या सर्वच्या वेशभूषा साकारल्या त्यामुळे विद्यार्थ्यांमध्ये एकच उत्साह संचारला असून सर्व गावच शाळेच्या प्रवेशोत्सवात रमले.विद्यार्थ्यांची सध्याची सर्वात आवडती मालिका असलेली तारक मेहताचा उलटा चष्मा याच मालिकेची थीम घेऊन तालुक्यातील पीएमश्री जीप प्राथमिक शाळा पळसखेड येथे शाळा प्रवेशोत्सव साजरा केला यावेळी या मालिकेतील विविध पात्र गटसाधन केंद्रातील साधन व्यक्ती, विशेष शिक्षक, समावेशित विशेष तज्ञ यांनी रंगविले. त्याच मालिकेतील सोडी यांच्या जीप्शीतून वर्ग पहिलीतील विद्यार्थ्यांना शाळेत आणले यावेळी संपूर्ण गावातून फेरी काढत विद्यार्थ्यांचे स्वागत केले गावतील नागरिक आणि पालकांनी ही या अगळ्यावेगळ्या उपक्रमाचे स्वागत करीत या उपक्रमाचा भाग बनले, चौकाचौकात विद्यार्थी सोबत पालकही थिरकले

# अचलपुरातील तीन भागात दूषित पाणीपुरवठा

## नागरिकांचे आरोग्य धोक्यात नागरपरिषद प्रशासनाकडून दुर्लक्ष, कार्यकर्त्यांचा इशारा

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२३अचलपूर**



अचलपूर शहरातील हिरापुरा, अन्वरपुरा, दिलदारपुरा या भागांमध्ये गेल्या काही दिवसांपासून दूषित पाणीपुरवठा सुरू असून नागरिकांमध्ये पोटदुखी, मळमळ, जुलाब व उलट्यांसारख्या आजारांचा प्रादुर्भाव दिसून येत आहे. या गंभीर समस्येकडे नगरपरिषद प्रशासन, मुख्याधिकारी धीरजकुमार गोहाड आणि पाणीपुरवठा अभियंता मनीष शर्मा यांनी दुर्लक्ष केल्याचा आरोप सामाजिक कार्यकर्ते फिरोज खान आणि शकील शाह यांनी केला आहे.शहरातील हिरापुरा, अन्वरपुरा आणि दिलदारपुरा या भागातील घरांमध्ये नळाद्वारे येणारे पाणी अतिशय घाण व दुर्गंधीयुक्त असून ते पिण्यायोग्य नसल्याने नागरिकांना आरोग्याच्या समस्या निर्माण होत आहेत. यामुळे लहान मुलं, ज्येष्ठ नागरिक आणि महिलांचे आरोग्य धोक्यात आले आहे. अनेक ठिकाणी उलट्या, जुलाब, मळमळ यांसारख्या लक्षणांमुळे वैद्यकीय मदतीची गरज भासू लागली आहे.सामाजिक कार्यकर्ते फिरोज खान आणि शकील शाह यांनी तीन दिवसांपूर्वीच पाणीपुरवठा अभियंता मनीष शर्मा तसेच ठेकेदार देशमुख यांच्याशी फोनवर संपर्क साधून या समस्येबाबत माहिती दिली होती. त्यानंतर केवळ एक दिवस पाणीपुरवठा बंद ठेवण्याची घोषणा अलाऊन्समेंटद्वारे करण्यात आली. मात्र, पाण्याची गुणवत्ता सुधारण्याबाबत कोणतीही ठोस उपाययोजना करण्यात आलेली नाही.या प्रश्नाकडे त्वरित लक्ष देऊन उपाययोजना न केल्यास, नगरपरिषद प्रशासनाविरोधात नागरिक रस्त्यावर उतरतील आणि नगरपरिषदेचा घेराव केला जाईल, असा इशारा कार्यकर्त्यांनी दिला आहे. कोणतीही अनुचित घटना घडल्यास संपूर्ण जबाबदारी नगरपरिषद प्रशासनावर राहील, असा स्पष्ट इशारा फिरोज खान आणि शकील शाह यांनी दिला आहे.मुख्याधिकारी धीरज कुमार गोहाड आणि पाणीपुरवठा विभागाचे अभियंता मनीष शर्मा यांनी नागरिकांच्या आरोग्याशी संबंधित या गंभीर समस्येकडे तत्काळ लक्ष देऊन, पाणीपुरवठा व्यवस्था सुधारावी व दोषी ठेकेदारावर कारवाई करावी, अशी मागणी नागरिकांतून होत आहे.

# जिल्हाधिकाऱ्यांच्या नावे बनावट फेसबुक खाते : प्रतिसाद न देण्याचे आवाहन

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२३अमरावती**



जिल्हाधिकारी आशिष येरेकर यांच्या नावे बनावट फेसबुक खाते तयार करण्यात आले आहे. यावरून विविध प्रकारच्या विनंत्या पाठविण्यात येत आहे. यास कोणीही प्रतिसाद देऊ नये, असे आवाहन जिल्हाधिकारी आशिष येरेकर यांनी केले आहे.जिल्हाधिकारी श्री. येरेकर यांच्या नावे बनावट खाते करून फ्रेन्ड रिक्वेस्ट पाठविण्यात येत आहे. तसेच सैन्य दलातील मित्राचे फर्निचर विकायचे असल्याची पोस्ट करण्यात आली आहे. हा फसवणुकीचा प्रकार असल्याने त्यास प्रतिसाद देऊ नये. अशा प्रकारची कोणतीही पोस्ट किंवा खाते तयार करण्यात आले नसून नागरिकांनी बनावट खात्याशी कोणताही आर्थिक व्यवहार करू नये किंवा संपर्क साधू नये. यात नागरिकांची फसवूणक होण्याची शक्यता आहे. त्यामुळे जिल्हाधिकारी आशिष येरेकर यांच्यासह जिल्हा प्रशासनातील वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या नावे फसवणूकीचे संदेश आल्यास स्विकारू नये किंवा ब्लॉक करावे, असे आवाहन जिल्हाधिकारी आशिष येरेकर यांनी केले आहे.

# जिल्हा परिषदेच्या १५७२ व मनपाच्या ६३ शाळांमध्ये पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांचे शुभेच्छा पत्राचे वाचन

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२३अमरावती**



४५ दिवसानंतर जिल्ह्यातील सर्व सरकारी निमसरकारी व खाजगी शाळांची घंटा आज वाजली .. शाळेमध्ये प्रवेश घेणाऱ्या नवीन व जुन्या विद्यार्थ्यांना महसूल मंत्री तथा पालकमंत्री श्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी शुभेच्छा पत्र देऊन विद्यार्थीचे शाळेमध्ये स्वागत केले..

जिल्ह्यातील तब्बल १६३५ शाळांमध्ये महसूल मंत्री तथा पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांचे शुभेच्छापत्र वाचण्यात आले.. यामध्ये जिल्हा परिषदेच्या १५७२ शाळेत तर मनपा च्या ६३ शाळा मध्ये ५००० च्या वर शिक्षकांना लाखो विद्यार्थींना शुभेच्छा पत्र द्रारे स्वागत व शुभेच्छा दिल्या ,हे शुभेच्छा पत्र शाळे तर्फे वाचण्यात आले...

आज पासून शाळेची घंटा वाजली आहे.. आजचा दिवस हा विद्यार्थी शिक्षक व पालकांसाठी अत्यंत महत्त्वाचा व आपला उज्वल भविष्य निर्माण करण्याचा पहिल पाऊल आहे,हा दिवस शाळेचा प्रवेशउत्सव म्हणून साजरा करण्या सारखा आहे... शाळेच्या पहिल्या दिवसाच्या या शुभ दिनी शाळेत येणारे सर्व नवीन व जुन्या विद्यार्थ्यांचे मनःपूर्वक स्वागत यावेळी पत्र द्रारे पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी केले..

**तसेच शिक्षक पालकांना शुभेच्छा दिल्या**

हा दिवस नवीन सुरुवात नवीन स्वप्न आणि नवीन संधी घेऊन येणार आहे शाळा म्हणजे अभ्यासा सोबतच नवीन मित्र, नवीन अनुभव व नवीन गोष्टी शिकण्यासाठी व नवीन संधी मिळवण्यासाठीचा हा दिवस असतो.. विद्यार्थ्यांनी शाळेत येऊन खूप काही शिकाल, मोठे व्हाल आणि देशाचे नाव उज्वल करण्याची अपेक्षा यावेळी चंद्रशेखर बावनकुळे यांनी केली...

शिक्षकांनी आपले काम निष्ठेने करावे आणि पालकांनी आपल्या मुलांना प्रोत्साहन द्यावी आणि आपल्या विद्यार्थ्यांच्या पाठीमागे खंबीरपणे उभे राहावे.. यासोबतच आजचा दिवस बाल मित्रांसाठी खूप खास दिवस असतो,या दिवसाचा आनंद घ्या आणि एक चांगला माणूस म्हणून समाजात आपले स्थान निर्माण करण्याची अपेक्षा महसूल मंत्री तथा पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी केली..

# हवेने किंवा तोडलेल्या झाड्याच्या फांद्या कोणी उचलायच्या जबाबदारी निश्चित करा- तुषार भारतीय

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२३अमरावती**



पावसाळ्या अगोदर विजेच्या तारेवर येणारी झाडे किंवा झाडाच्या फांद्या तोडल्यावर तसेच जोरदार वाऱ्याने पडलेली झाडे कोणी उचलायचे हे मनपा ने त्वरित निश्चित करावी, अमरावती शहरात अनेक ठिकाणी तसेच साई नगर प्रभागात एक महिन्यापासून कचऱ्याचे ढीग पडले आहे. नागरिक वारंवार तक्रार करून समस्येचे निराकरण होत नसून उद्यान विभागा कडे उचलण्याची पुरेसी व्यवस्था नाही तर स्वच्छता विभाग म्हणते की आमची जबाबदारी नाही. मनपा मध्ये कोठलाही जनप्रतिनिधी गेल्या ३ वर्षापासून नसल्याने नागरिकानी तक्रार कोणाकडे करावी ही मोठी समस्या होऊन बसली आहे. विजेचे तारा वर अजूनही झाड्याच्या फांद्या आल्याने थोड्याही हवेने वीज वारंवार जात आहे झाडे कटाई साठी उपलब्ध शक्तिमान विशिष्ट भागात आणि मोजक्याच लोकांच्या सांगण्याने जात आहे. कुठल्या भागात जाणार याची कुठलाही नोंद नसल्याने झाडे कटाई समस्या जशीच्या तशीच आहे.स्वस्तिक नगर ,जया प्रभा कॉलनी ,वनीकरण रोड , शिलाँगण रोड ,गणेश विहार नं १ व २ शारदा विहार ,कृष्णार्पण कॉलनी ,जगदाळे ले आऊट, रविकिरण कॉलनी ,राम मंदिर जवळ,अयोध्या विहार या ठिकाणची कचऱ्याचे ढीग त्वरित उचलून या बाबतची जबाबदारी निश्चित करावी अशी मागणी माजी स्थायी समिती सभापती तथा सभागृह नेता तुषार भारतीय यांनी मा मनपा आयक्तांकडे केली आहे.

# अमरावती सह विदर्भात उद्या पासून जोरदार बरसणार पाऊस

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२३अमरावती**

गेल्या अनेक दिवसांपासून उकाड्याने त्रासलेल्या विदर्भातील नागरिकांवर मान्सूनच्या ढगांची मेहरबानी होण्याची शक्यता निर्माण झाली आहे. येत्या मंगळवारी २४ जूनपासून नागपूरसह विदर्भात मध्यम ते जोरदार पाऊस होण्याचा अंदाज हवामान खात्याने वर्तवला आहे. रविवारी तशी स्थितीही तयार झाली. मोठ्या फरकाने तापमान घसरून वातावरणात गारवा निर्माण झाला.हवामान विभागाच्या अंदाजानुसार २४ जूनपासून पुढील पाच दिवस, म्हणजे शनिवार २८ जूनपर्यंत विदर्भातील नागपूर, भंडारा, गोंदिया, अकोला, अमरावती, वर्धा,बुलढाणा जिल्ह्यात जोरदार पावसाची शक्यता वाढली आहे. उर्वरित चंद्रपूर, गडचिरोली, वाशिम, यवतमाळ जिल्ह्यांत मात्र मध्यम पावसाची शक्यता व्यक्त केली आहे. त्यामुळे भात, सोयाबीन, कापूस पेरणीसाठी अनुकूल वातावरण निर्माण होणार असल्याचे तज्ज्ञांनी व्यक्त केले आहे.दरम्यान, शनिवारचा दिवस उकाड्यात गेल्यानंतर रविवारी वातावरणात काहीसा गारवा निर्माण होत नागरिकांना दिलासा मिळाला. नागपूरचापारा २४ तासात ५.४ अंशाने घसरत ३२.४ अंशांवर खाली आला, जो सरासरीपेक्षा २.७ अंशाने कमी आहे. अकोला, अमरावती, गोंदिया, भंडारा, वर्धा या जिल्ह्यात तापमान ३ ते ५ अंशांनी खाली घसरले. शनिवारी रात्री चंद्रपूर, ब्रह्मपुरी, गडचिराली जिल्द्ह्यांत पावसाने चांगली हजेरी लावली, तर गोंदिया जिल्ह्यात २४ तासात किरकोळ पावसाच्या सरी बरसल्या. बदलत्या वातावरणीय स्थितीमुळे यापुढे नागरिकांची प्रतीक्षा संपेल व मान्सूनचे ढग मनसोक्त बरसतील, अशी शक्यता हवामान तज्ज्ञांनी व्यक्त केली आहे. विदर्भात किमान २८ जूनपर्यंत जोरदार पाऊस होईल, असा अंदाज आहे त्यामुळे पेरणीच्या तयारी असलेल्या शेतकऱ्यांना जमिनीत पुरेसा ओलावा मिळेल व नुकसान टळेल, अशी शक्यता आहे.

# आता इयत्ता पहिलीच्या अभ्यासक्रमात ‘१०९८’ टोल फ्री क्रमांक


## लहान वयातच मुलांना सामाजिक सुरक्षा यंत्रणांबद्दलची माहिती मिळावी हा उद्देश्य

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२३अमरावती**

राज्य शिक्षण मंडळाने इयत्ता पहिलीच्या अभ्यासक्रमात बालहिताच्या दृष्टीने ‘१०९८’ हा टोल फ्री हेल्पलाइन क्रमांक समाविष्ट करून, महत्वाचा निर्णय घेतला आहे. या निर्णयामुळे मुलांमध्ये लहान वयातच स्वतःच्या हक्कांविषयी जागरूकता, संकटात मदत घेण्याचा आत्मविश्वास, आणि सुरक्षेची भावना रुजवण्याचा प्रयत्न होणार आहे. या क्रमांकाचा उल्लेख पूर्वी इयत्ता तिसरीच्या पाठ्यपुस्तकात होता. मात्र आता तो इयत्ता पहिलीपासूनच शिकवण्यात येणार आहे. लहान वयातच मुलांना सामाजिक सुरक्षा यंत्रणांबद्दलची माहिती मिळावी हा या मागचा उद्देश आहे.

**‘१०९८’ म्हणजे काय?**

‘१०९८’ हा बालहक्क संरक्षणासाठी कार्यरत असलेल्या ‘चाईल्डलाइन इंडिया फाउंडेशन’ या संस्थेचा मोफत टोल फ्री क्रमांक आहे. हा क्रमांक २४७ (संपूर्ण दिवस व रात्र) कार्यरत असतो, आणि भारत सरकारच्या महिला व बालविकास




मंत्रालयाच्या अधिपत्याखाली कार्य करतो. हा क्रमांक १८ वर्षांखालील सर्व बालक आणि बालिकांसाठी उपलब्ध आहे. बालविवाह, बालमजुरी, शारीरिक, मानसिक अत्याचार, उपेक्षा, विस्थापन, बेपत्ता होणे किंवा इतर संकटग्रस्त स्थितीत असलेल्या कोणत्याही मुलासाठी या क्रमांकावर त्वरित मदत मिळू शकते.

बालकांमध्ये आत्मविश्वास व जनजागृतीसाठी हा प्रभावी टप्पा मानला जात आहे. या क्रमांकाचा अभ्यासक्रमात समावेश करून शालेय वयातच मुलांना अत्याचार सहन करणे नाही, तर मदतीसाठी आवाज उठवणे हे शिकवण्याचा अत्यंत सकारात्मक प्रयत्न केला जात असल्याची प्रतिक्रिया शिक्षकांनी व्यक्त केली आहे. मात्र शिक्षक व पालकांनीही या क्रमांकाचे महत्त्व मुलांना समजावून देणे आवश्यक आहे. या माध्यमातून सामाजिक सुरक्षिततेसाठी शिक्षणातून पुढाकार घेण्यात येत आहे. शालेय वयातच मुलांमध्ये कायद्याचा आधार, आत्मभान आणि सामाजिक सुरक्षा यांचा परिचय करून देणे, हा १०९८ क्रमांक अभ्यासक्रमात आणण्याचा उद्देश असल्याचे शिक्षण विभागा कडून सांगण्यात आले शिक्षण हे केवळ अभ्यासापुरते मर्यादित न राहता, मुलांच्या सर्वांगीण विकासासाठी आणि संरक्षणासाठी वापरण्याचा हा एक महत्त्वाचा टप्पा आहे.